# तिसरा शिक्का

शुभ संध्याकाळ, मित्रांनो. आपण काही क्षण प्रार्थनेसाठी आता उभे राहूया. आपण आपली मस्तके झुकवूया.

2 आमच्या स्वर्गीय पित्या, जेव्हा आम्ही ती—ती सुंदर गीते ऐकतो, प्रभू, आम्ही—आम्ही विचार करतो...की तू जवळ आहेस. आणि आम्ही प्रार्थना करतो की, प्रभू, तू आज रात्री तुझी लेकरे म्हणून, आमचा स्विकार करशील, आमच्या सर्व पापांची आणि उल्लंघनाची क्षमा करशील, आणि आम्हाला तुझा आशीर्वाद देशील, कारण आम्ही गरजू लोक आहोत.

3 आणि ह्या समयात आम्ही आता रहात आहोत, आणि आम्ही पाहतो, वर्षानुवर्षे ह्या जगात अधिक अंधकार होत चालला आहे. आणि प्रभूचे येणे अधिक प्रखर होत आहे, जसे तो स्वत:स...त्याच्या वचनात आणि त्याच्या प्रकटीकरणात प्रकट करीत आहे. आम्ही पुन्हा ह्या रात्री त्याच उद्देशाने ह्या सभेत आलो आहे, आणि प्रभू तुजकडे प्रार्थना करतो की ह्या पुस्तकातील तीसरा शिक्का आम्हासाठी उघड; ह्यासाठी की आम्हाला कळेल की, आम्ही काय–काय करावे आणि कसे जगावे, आणि अधिक चांगले ख्रिस्ती कसे व्हावे.

4 परमेश्वरा, मी प्रार्थना करीतो की आज रात्री येथे असलेल्या प्रत्येक अख्रिस्ती व्यक्तिंना त्यांची तुझ्याविषयी गरज ओळखू दे. मान्य कर. आणि—आणि स्वर्गीय पित्या, मी प्रार्थना करतो की प्रत्येक नविन जन्म पावलेला ख्रिस्ती समजेल की पूर्वी होतो, त्यापेक्षा अधिक जवळ असे मला जगले पाहीजे की आपण सर्व ख्रिस्ती प्रेम आणि विश्वासाच्या ऐक्यात येऊ.

5 प्रभू, आज रात्री आमच्यामधील प्रत्येक आजारी व्यक्तीला आरोग्य मिळू दे. त्यांना आवश्यकतेनुसार तुझ्या प्राप्तीची गरज कळली आहे. आणि, पित्या मी प्रार्थना करतो की तू त्या सर्व गोष्टी आशीर्वादीत कर ज्या, तुझ्या सन्मानासाठी आणि गौरवासाठी केल्या, किंवा बोलल्या जात आहेत, हे आम्ही येशूच्या नावात मागत आहोत. आमेन.

6 हे चांगले आहे, की आज रात्री, आपण पुन्हा, ह्या आठवड्याच्या बुधवारच्या रात्री सभेसाठी एकत्र झालो आहोत. आणि आज रात्री आम्ही प्रभूवर विश्वास करतो की त्याने त्याच्या वचनावर त्याच्या एक—एक महान आशीर्वादांचा साठा ओतावा. आणि आज मी नेहमीप्रमाणे अध्ययन करीत होतो, आणि त्या गोष्टींचा विचार करण्याचा प्रयत्न करीत होतो, ज्या बोलण्यासाठी योग्य असतील, आणि त्या, कशा सांगाव्या, आणि मग प्रभूवर अवलंबून होतो की मला त्याने ह्या लिहीलेल्या वचनाचा अनुवाद व अर्थ सांगावा. आणि मी त्याचा आभारी आहे की त्याने ह्या आठवड्यात आपल्यासाठी जे केले आहे,...आणि त्या शिक्क्याच्या उघडण्यासाठी अति आभारी आहे.

7 आणि आता, ही एक चांगली गोष्ट होईल, जर रविवारी सकाळी येथे...तुम्हाला माहीत आहे कित्येक वेळा...आपला गैरसमज व्हावा अशी इच्छा नसते, परंतु तुम्हाला माहीत आहे...ते तशाप्रकारे होते. आणि म्हणून रविवारी सकाळी, जर कोणाच्या मनात शिक्क्यांसंबंधी काही प्रश्न असतील तर ते लिहून ते शनिवारी रात्री ह्या येथे टेबलवर ठेवतील. आणि जेणेकरुन मी ते पाहू शकेन. आणि जर प्रभूची इच्छा असेल तर रविवारी सकाळी मी तुम्हाला त्यांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करीन. मला वाटते हे त्यापेक्षा योग्य होईल ज्याविषयी आपण अगोदर योजना करीत होतो, कारण कधीकधी त्याविषयी

गैरसमज केला जातो, तुम्हाला माहीत आहे. आणि तशा प्रकारे...हे योग्य होईल की मी—मी सरळ त्या प्रश्नांना पाहीन. मग ते तसेच होईल जसे हे असले पाहीजे...

8 कोणीतरी आज मला बोलावले आणि म्हणाला, की, फोन केला आणि जाणू इच्छित होतो की हे खरे आहे की, "जेव्हा स्वर्गरोहण होईल, तेव्हा तेथे जेफर्सनव्हिलेतून केवळ एक व्यक्ति असेल आणि एक न्यूयॉर्कमधून असेल आणि बाकीचे समुद्रापलीकडे असतील." तर पाहा, हा गैरसमज आहे. नंतर कोणीतरी म्हणाला, की "शनिवारी रात्री जर प्रभू शेवटचा शिक्का आम्हास प्रकट करील, तर रविवारी सकाळी येशू येथे असेल." पाहा? म्हणून हे...ते तसे नाही. आणि तुम्ही गैरसमज करु नका...ते तसे नाही.

9 आम्हाला माहीत नाही. जर कोणी म्हणेल की त्यांना माहीत आहे की तो केव्हा येणार आहे, तुम्हाला माहीत आहे ते चुकीचे आहे; मुळात चुकीचे आहे, कारण ते कोणालाच ठाऊक नाही. परंतु आपल्याला आज असे जगायचे आहे, जसे ते आताच घडणार आहे.

10 आता एक मिनिटासाठी मी तुमचे लक्ष दुसरीकडे वळवणार आहे, तरी तुम्ही तयार राहा. मी—मी विश्वास करीतो की, येशू आतापासून तीन मिनीटापेक्षा कमी, त्याच्या समयाच्या, समयात येईल. तुम्हाला माहीत आहे काय, तो समय किती असेल? अंदाजे पस्तीस वर्षे समजले? हजार वर्षे त्याच्यासाठी एक दिवसासारखी आहेत, तुम्ही पाहीले.

11 म्हणून, जेव्हा तुम्ही ऐकले की शिष्यांनी परत येऊन सांगितले की, "समय अगदी जवळ आहे," येथे, "समय अगदी जवळ आहे." प्रेषितांनी ते प्रकटीकरणात सांगितले होते तुम्हाला माहीत आहे, की ह्या गोष्टीस सांगून किती समय झाला?...परमेश्वरासाठी ती फक्त कालची गोष्ट आहे, त्या गोष्टीस अजून दोन दिवसही झाले नाही.

12 आणि, पाहा, जर त्याच्या आगमनासाठी तीन मिनीटे किंवा तीन मिनीटांपेक्षाही कमी समय बाकी आहेत, तर आपल्यासाठी जवळजवळ तीस वर्षे किंवा काही तेवढाच समय असेल. आणि पाहा, त्याच्यासाठी तीन मिनीटे काय असतील. तो येण्यासाठी अगोदरच उठला आहे...जेव्हा कधी तुम्ही येथे वाचाल, तो त्याच्या वचनाच्या अटीप्रमाणे बोलतो, आपल्या अटीप्रमाणे नाही, समजले.

13 आणि मग जर मला कळले की तो उद्या रात्री, उद्या रात्री येणार आहे, तर उद्या मी अभ्यास करीन आणि त्याच्याकडे चौथ्या शिक्क्याचा संदेश मागेन. आणि मी येथे येईन आणि त्याचा प्रचार त्याच प्रकारे करेन. समजले? जर तो आला. मी—मी प्रत्येक दिवशी तसेच कार्य करीत राहीन जसे मी करीत होतो. आणि मला माझ्या कामात असणे ह्यापेक्षा दुसरी अधिक जागा माहीत नाही; समजले, आपले कर्तव्य करीत राहणे. म्हणून आपण आपले कार्य तो येईपर्यंत चालू ठेवू.

14 कधी-कधी जेव्हा आपण केवळ वाचतो, आणि आता, तुम्ही अधिक सावध असा. आणि जेव्हा तुम्ही वाचता, टेप मिळवा, त्या लक्षपूर्वक ऐका. कारण ते तुम्हाला टेपवर मिळेल, कारण लोक टेप चालवीत आहेत, आणि त्या खरोखरीच चांगल्या आणि स्पष्ट आहेत. म्हणून तुम्हाला त्या टेपवर अधिक सुस्पष्ट कळेल.

15 आता, ह्या रात्री मी आशा करितो की प्रत्येकजण ख्रिस्ताच्या प्रेमात आहेत आणि प्रत्येकजण त्याच्यावर प्रेम करीतो.

16 मी तुम्हाला सांगतो, की कधी-कधी काही लोक गोंधळात पडतात त्याचे कारण म्हणजे त्यांना सभेचा पहिला भाग मिळत नाही. तुम्हाला समजले. तेव्हा ते येतात आणि तुम्हाला मागील गोष्टींचा संदर्भ देताना ऐकतात, आणि तेव्हा त्यांना जे सांगितले जात आहे ते कळते, आणि त्यांना पहीला भाग समजत नाही. तेव्हा त्यांच्यासाठी ह्या सर्व गोष्टी

गोंधळात टाकणाऱ्या वाटतात, तुम्हाला समजले. आणि त्यांना वाटते की काहीतरी वेगळे सांगितले आहे, परंतु—परंतु वास्तवात असे नसते.

17 म्हणून जर तुम्हाला समजत नाही, असे काही प्रश्न तुमच्याकडे असतील, तर ते एका कागदावर लिहा. ते ह्या समयात कधीही आणि शनिवार रात्रीपर्यंत येथे ठेवा. आणि रविवारी सकाळी, मी त्यांचे उत्तर देण्याचा प्रयत्न करीन…जर ते काही अचंभित करणार असतील जसे तुम्ही म्हटले, "ठीक आहे, मी अचंभीत आहे की *येथे* ह्याचा काय अर्थ आहे, मला हे समजत नाही." तुम्हाला ठाऊक आहे, की मला येथे काय म्हणायचे आहे. मग जर प्रभूची इच्छा असेल तर रविवारी सकाळी मी त्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करीन.

18 आता, ह्या रात्री आपण ह्या आशीर्वादीत वचनांतून 6व्या अध्यायातून वाचणार आहोत. आणि आपण आज रात्री तिसऱ्या शिक्क्यापासून सुरुवात करणार आहोत. आणि 5वे वचन, 5वे आणि 6वे वचन पाहणार आहोत.

19 आणि उद्या रात्री आपण चार घोडेस्वार अर्थात पांढरा घोडा, आणि लाल घोडा, काळा घोडा, आणि फिक्कट घोडा, समाप्त करणार आहोत.

20 आणि मला हे सांगावेसे वाटते. प्रत्येक वेळी ह्या सकाळपर्यंत…मी लवकर, पहाटे उठलो आणि सर्व गोष्टी व्यवस्थित होण्याअगोदर प्रार्थनेत गेलो, आणि दिवसभर प्रार्थना करीत राहीलो. परंतु ह्या सकाळी, पहाटेस, मी जेथे होतो तेथे पवित्र आत्मा आला, आणि मी—मी ह्या शिक्क्यास एखाद्या वस्तुसारखे स्पष्टपणे उघडताना पाहीले. आता—आता—आता मला ठाऊक आहे, की तो माझी प्रार्थना ऐकतो. आणि मी त्याचा अत्यंत आभारी आहे.

21 आता, तुम्ही फक्त लक्ष द्या, की काहीतरी घडत आहे. मी—मी विश्वास करीतो की तुम्ही समजत आहात, पाहा, की तेथे काहीतरी घडत आहे. मी ह्या मंडळीची एकदा पारख घेऊ इच्छितो; आणि पाहू इच्छितो की काय तुम्ही कुठली घटना घडण्यापूर्वी तीला पकडता काय? आता लक्षात ठेवा, लक्षात ठेवा जे मी तुम्हाला सांगितले आहे. आणि आता, प्रभू, आम्हास सहाय्य कर.

22 आता पाचव्या वचनात.

> *त्याने तिसरा शिक्का फोडला, तेव्हा तिसरा प्राणी, ये, असे म्हणाला, ते मी ऐकले मग मी पाहीले तो एक काळा घोडा, आणि त्याच्यावर बसलेला कोणीएक माझ्या दृष्टीस पडला, त्याच्या हातात तराजू होते.*
>
> *आणि जणू काय चार प्राण्यांच्या मधून निघालेली वाणी मी ऐकली, ती* अशी, *रुपयाला शेरभर गहू, आणि रुपयाला तीन शेर जव,* पण *तेल व द्राक्षारस ह्यांची खराबी करु…नको.*

23 आता, आपण थोडी पार्श्वभूमी तयार करण्यासाठी, त्या शिक्क्यांना पाहू, ज्यांचा अभ्यास आम्ही केलेला आहे. कारण, मंडळीच्या युगांप्रमाणे ह्यांना एक दुसऱ्याबरोबर जोडू शकू, म्हणूनच आम्ही त्याची पार्श्वभूमी देण्याचा प्रयत्न करतो की ह्या गोष्टी तुम्हाला व्यवस्थित समजू शकतील…वचनामध्ये मंडळीची युग ठीक अशाप्रकारे आहेत, ते एकमेकांशी जोडलेले आहेत. ज्याप्रकारे शीडीवर चढणे आणि एकेक पायरी चढणे, किंवा शिडीच्या पायऱ्या, दूसऱ्या पायऱ्याशी जोडलेल्या असतात. आणि शीडीच्या पायऱ्या एक दुसऱ्याच्या वर असतात.

24 आणि आता हे शिक्के...हे एक मुक्तीचे पुस्तक आहे, जे मोहरबंद आहे. प्रत्येकाला हे समजते का? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] आणि हे पुस्तक सात शिक्क्यांद्वारे मोहरबंद केलेले आहे. ते सात शिक्क्यांचे पुस्तक आहे. समजले?

25 आणि आता लक्ष द्या, की आम्ही ह्याचे चित्रण तुम्हाला यिर्मया आणि इतर सर्व पुस्तकांतून दाखवले आहे. आता जेव्हा त्यांच्याकडे होते...त्यांनी ते एका दस्तऐवजाच्या तुकड्यावर *असे* लिहीले, किंबहुना ते कागदावर नव्हते, परंतु ते कातडे होते. [भाऊ ब्रॅन्हम त्याचे प्रात्यक्षिक कागदाचे तुकडे वापरुन ती गुंडाळी उघडून आणि मोहरबंद करुन दाखवतात.—सम्पा.] आणि ते ह्याप्रकारे *ते* गुंडाळतात. आता...आणि मग त्याचा शेवटचा भाग *असा* ठेवला जातो, की त्यात काय आहे, हे तो दाखवतो. नंतर दुसरे दस्तऐवज त्यावर *त्याचप्रकारे* गुंडाळले जाते आणि नंतर, शेवटी येथे ते *अशा*प्रकारे फाडले जाते आणि दुसरे सोडले जाते.

26 ठीक आहे, हे सात शिक्क्यांचे पुस्तक आहे. आता काही समयापुर्वी आपल्याकडे *असे* पुस्तक कधीच नव्हते. जुन्या काळात पुस्तके गुंडाळीच्या स्वरुपात असत. ती, गुंडाळलेले असत. आणि जेव्हा त्यांना एखादा विषय किंवा काही वाचायचे असेल...जसे जर—जर बायबल एका गुंडाळीच्या स्वरुपात आहे. तुम्हाला यशयाचे पुस्तक वाचायचे आहे, तर तुम्ही यशयाचे पुस्तक वाचण्यासाठी येथे यशयाकडे वळाल, मग ती गुंडाळी *अशी* उघडणार आणि ते वाचणार. आणि हे सात शिक्क्यांचे पुस्तक मुक्तीचे पुस्तक आहे.

27 आणि आता आपण पाहतो की कोकरा बाहेर येतो, जो राजासनावर बसलेला आहे त्याच्या हातांतून ते पुस्तक घेतो, आणि शिक्के फोडतो, आणि—आणि...शिक्के लोकांना प्रकट करतो.

28 आणि ते चार प्राणी तेथे बसलेले आहेत, हे तेच चार प्राणी, जे आपण मंडळी युगाचे अध्ययन करताना पाहीले होते. तुम्ही त्यांना पवित्रशास्त्रात, सर्व ठिकाणी पाहता, आणि ते तेच आहेत जे शिक्के फोडल्याचे जाहीर करीतात. आता, आणि आपण पाहतो की हे एक—एक मुक्तीचे पुस्तक आहे.

29 नंतर आम्ही मागे गेलो आणि आम्ही सोडवावयाजोगा आप्तजन पाहीला, आणि पाहीले की त्याचे कार्य काय आहे. आणि आता एवढ्या वर्षात ख्रिस्त सोडवावयाजोगा आप्तजनाचे कार्य करीत आहे. आता, ज्या सर्वांना हे समजले आहे त्यांनी, “आमेन” म्हणा. [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] तो सोडवावयाजोगा आप्तजनाचे कार्य करीत आहे.

30 परंतु तेथे असा एक समय येईल तेव्हा मुक्तीचे कार्य संपेल. आणि जेव्हा मुक्तीचे कार्य संपेल, तेव्हा तो पित्याचे राजासन सोडेल, ज्यावर तो आता बसलेला आहे. परंतु ते त्याचे राजासन नाही. “मी जसा विजय मिळवून आपल्या पित्याबरोबर त्याच्या राजासनावर बसलो, तसा जो विजय मिळवतो त्याला मी आपल्या राजासनावर आपल्याबरोबर बसू देईन.” ते त्याचे राजासन नाही. ते आत्म्याचे, देवाचे राजासन आहे. ते ख्रिस्ताचे अर्थात कोकऱ्याचे नाही. पाहा तो तर देहधारी परमेश्वर आहे, जो तोच परमेश्वर आहे, जो देहधारी झाला. आता तो राजासनावरुन उठला आहे...

31 प्रथम, ही घोषणा होते की, “हे मुक्तीचे पुस्तक घेण्यास कोण...समर्थ आहे?” कारण पाहा, आदामापासून, मुक्तीची पूर्ण योजना, आदामाने गमावली होती.

32 आदामा अगोदर काहीच हरवले नव्हते. आणि आदामानंतर, जे काही पृथ्वीवर होते, ते सर्व गमावले गेले होते. आणि पृथ्वीवरील सर्वकाही गमावले गेले होते. आणि आदामाबरोबर सर्व वस्तुंचे पतन झाले होते आणि सर्वांनी ती दरी ओलांडली होती, कोणीही परत येऊ शकत नव्हते, कुठलाच मार्ग नव्हता. मनुष्य, जेव्हा त्याने पाप केले

त्याने त्याचा मार्ग सोडला, त्याने परत येण्याचा कुठलाही मार्ग त्यासाठी सोडला नाही. आणि मग...

33 जेव्हा हा प्रश्न विचारला गेला; योहान प्रकटीकरण लिहीणारा...योहान संदेष्टा, दृष्टांत पाहात होता आणि त्याने ते पाहीले. तेव्हा स्वर्गात, पृथ्वीवर किंवा पृथ्वीखाली, कोणीही, ती गुंडाळी उघडावयास किंवा तिच्यात पाहावयास समर्थ नव्हता. समजले? आता ह्यावर विचार करा! तेव्हा कोकरा पुढे आला, आणि त्याने ते पुस्तक घेतले. आता योहानाला सांगण्यात आले की ह्यापुढे रडू नको. तो म्हणाला, "यहुदा वंशाचा सिंह, दाविदाचा अंकूर ह्याने जय मिळवला, आणि—आणि तो पुस्तक घेण्यास आणि उघडण्यास योग्य ठरला आहे." म्हणून तो सिंह पाहण्यास वळला, आणि त्याला एक कोकरा दिसला, एक वडील त्याला म्हणाला, "सिंहाने जय मिळवला आहे." परंतु जेव्हा तो आला आणि पाहीले, तो राजासनावरुन येताना एक कोकरा होता.

34 आता, त्याने ह्या अगोदर ह्यावर कधीच लक्ष दिले नव्हते. का? कारण तो तेथे, त्याचे मध्यस्थीचे कार्य करीत होता, तो लोकांकरिता रक्तबंबाळ झाला होता, आणि लोकांसाठी मध्यस्थीचे कार्य करीत होता, जोपर्यंत तो शेवटचा जीव आत येत नाही ज्याचे नाव जगाच्या स्थापनेअगोदर कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात ठेवले आहे. तेथे त्यांच्यातील कित्येक जातील, आणि हे असेच आहे. हे सर्व असेच आहे. दुसऱ्यांना आत यायचे नाही; तशी त्यांची इच्छाही नाही. आणि म्हणून, जेव्हा तो शेवटचा जीव आत येईल, तेव्हा मुक्तीचा समय समाप्त होईल.

35 तेव्हा कोकरा त्याच्या अधिकारांचा दावा करण्यासाठी पुढे येतो ज्यांना त्याने सोडवले आहे, आणि ती संपूर्ण सृष्टी आहे. पृथ्वी आणि सर्वकाही त्याचे आहे. समजले? त्याने ते सर्व त्याच्या रक्ताने सोडवले आहे. आणि जेव्हा तो ते पुस्तक घेण्यासाठी आणि ते उघडण्यासाठी पुढे येतो...योहान आणखी रडत नाही. आणि त्याने पाहीले; आणि हा कोकरा वधलेला कोकरा होता. त्याला अगोदरच मारले गेले होते, परंतु तो पुन्हा जीवंत झाला होता. आणि आता आपण पाहतो की तो वधलेला कोकरा रक्तबंबाळ झाला होता; त्याच्या सर्व शरीरातून रक्त वाहत होते. त्याचा वध करण्यात आला होता. त्याचा वध झाल्यानंतर त्याला पुन्हा उठविण्यात आले होते. तो राजासनावर बसला होता किंवा *असे* म्हणा की राजासनाच्या मागे बसला होता; जे सर्व जीव येणार होते त्यांच्यासाठी मध्यस्थी करीत होता. मग जेव्हा शेवटचा जीव येथे आत येईल, तेव्हा त्याचे मध्यस्थीचे कार्य पूर्ण होते...देवाने अजूनही ते मुक्तीचे पुस्तक धरलेले आहे...समजले? आता तो फक्त आप्तजनाचे कार्य करीत आहे.

36 जसे, बवाज खाली गेला, आणि रुथ तेथे बसून बवाजाची वाट पाहत होती...माझे म्हणणे, बवाजाने सोडवणाऱ्या आप्तजनाचे काम केले. तुम्हाला मी हा प्रचार केला होता हे लक्षात आहे का, त्यास फार काळ झाला नाही? रुथ सरवा वेचित राहिली, आणि, रुथ, जे काही करीत होती; ते करीत राहिली, आणि शेवटची गोष्ट, जे रुथ करीत होती, ते हे होते की ती प्रतिक्षा करीत होती. तुम्हाला लक्षात आहे काय मी ह्याची मंडळीशी कशी तुलना केली होती? जेव्हा बवाज सोडवावयाजोगा आप्तजनाचे कार्य करण्यास खाली गेला. तेव्हा तो हे करीतो; की त्याने त्याचे पायतण काढले आणि त्याने साक्ष दिली, आणि नामीची सोडवणूक केली, आणि, त्याद्वारे रुथला प्राप्त—प्राप्त केले. आता, म्हणून, रुथ फक्त वाट पाहत होती, कारण तिने काम अगोदरच केले होते. तिने ही सर्व इतर कामे केली होती, परंतु आता ती वाट पाहत होती. आणि तेव्हा जेव्हा...मंडळी वाट पाहत आहे, विश्राम करीत आहे. (त्यांच्यातील कित्येक, त्यांच्यातील बहुतेक पृथ्वीतील मातीत), परंतु तो त्याचे सोडविणाऱ्या आप्तजनाचे कार्य करीत आहे.

37 आता जग हे अधिक वाईट होत चालले आहे. आणि पापाची रास वाढत आहे, आणि—आणि आजार, आणि संकट, आणि मृत्यु, आणि दु:ख वाढत आहे. अधर्मी पुरुष आणि अधर्मी स्त्रीया मरत आहेत, कर्करोग त्यांना खात आहे, आणि इतर सर्व गोष्टी, जेव्हा त्यांच्याकडे योग्य पुरेसा विश्वास त्यातून बाहेर निघण्यासाठी आणि तेथे पोहचून विश्वास धरण्यासाठी नाही.

38 आता लक्ष द्या. परंतु जेव्हा हे पूर्ण होते…जेव्हा त्याचे मध्यस्थीचे कार्य पूर्ण होते, तो पुढे येतो, त्याच्या हातांतून पुस्तक घेतो. आणि तेव्हा योहान आणि स्वर्गातील सर्वगोष्टी, आणि…वेदीखालील आत्मे ओरडण्यास सुरुवात करतात. हे आपल्याला 6व्या शिक्क्यात पुन्हा पाहायला मिळते. आणि कसे ते आनंद करतात! ते सर्व आणि—आणि वडील पाया पडतात. आणि पवित्र जनांच्या प्रार्थना ओततात. आणि वेदीखालील आत्मे ओरडतात, "तू योग्य आहेस, कारण तू आम्हास आमच्या देवासाठी सोडविले आहेस! आणि आम्ही पृथ्वीवर राजे व याजक म्हणून राज्य करण्यास, परत जात आहोत." ओह, तिथे एक महान…

39 आणि योहान म्हणाला, "स्वर्गात पृथ्वीवर, पृथ्वीच्याखाली आणि प्रत्येक सृष्ट प्राण्यांना," त्याविषयी परमेश्वराची स्तुती करताना त्याने ऐकले. तुम्हाला माहीत आहे, योहानाला तेथे निश्चितच त्याचे नाव सापडले असणार. तो सर्व समय!

40 तेव्हा तो म्हणाला, "तोच ते मुक्तीचे पुस्तक घेण्यास समर्थ आहे." आता ते न्यायाधिशाचे राहत नाही. ती सोडवणूक करणाऱ्याची आहे, आणि त्याने मुक्तिचे कार्य केलेले आहे.

41 आता तो मंडळीला दाखवणार आहे की त्याने काय केले आहे. आमेन. समजले? तेव्हा तो फक्त ते पुस्तक घेतो…परंतु पुस्तक बंद आहे. कोणालाही त्याविषयी काही माहीत नाही. त्यांना माहीत आहे की ते मुक्तिचे पुस्तक तेथे आहे, परंतु ते अंतिम दिवसात प्रकट केले जाणार आहे. प्रकटीकरण 10 प्रमाणे, सातव्या दूतास तो संदेश देण्यात येणार आहे. कारण, असे म्हटले आहे, की "सातव्या देवदूताची वाणी होईल त्या दिवसात म्हणजे सातव्या मंडळीच्या युगात, तो देवदूत कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल, तेव्हा देवाची सर्व गूजे पूर्ण होतील, त्याच्या संदेशाद्वारे." आणि ते प्रकट झाल्यावर, स्वर्गातून एक दूत खाली आला, जो ख्रिस्त होता. आता लक्ष द्या, हा दूत पृथ्वीवर आहे, एक संदेशवाहक आहे.

42 ख्रिस्त खाली येतो, तुम्ही त्याला प्रकटीकरणाच्या 10व्या अध्यायात पाहता, त्याने एक पाय भूमीवर; दुसरा पाय समुद्रावर ठेवला आहे; त्याच्या डोक्यावर मेघधनुष्य होते, डोळे जणू…आणि पाय अग्नी स्तंभासारखे, आणि असेच; त्याने आपला उजवा हात स्वर्गाकडे वर केला, आणि जो युगानुयुग जीवंत आहे, राजासनावर आहे, त्याची शपथ वाहून म्हटले, "आणखी अवकाश लागणार नाही." आणि जेव्हा त्याने ही शपथ घेतली, सात मेघगर्जनांनी त्यांचे शब्द काढले.

43 आणि लेखक, जो योहान होता, जेव्हा योहानाला वर उचलले गेले, आणि त्याने जे पाहीले ते तो लिहीणार होता. तो लिहीण्याची सुरुवात करु लागला. तो म्हणाला, "ते लिहू नको." कारण…"ते लिहू नको." तो म्हणाला, "ते मोहरबंद ठेव." त्यात काय होते? "ते मोहरबंद कर. ते सांगू नको." पाहा, ते प्रकट होणार आहे, परंतु ते वचनातदेखील लिहीलेले नाही.

44 आणि तेव्हा, जेव्हा त्याने शिक्के उघडण्यास सुरुवात केली, आपण पाहतो की ते सर्व गोंधळात पडले. समजले? जेव्हा त्याने पहिला शिक्का उघडला, त्याला वाटले, "आता

येथे तो सांगेल, आणि तो येईल *अमुक-अमुक* राजासन घेईल, आणि *कोणी हे* करील आणि *हे तो* करील."

45 परंतु जेव्हा हे होते, येथे एक पांढरा घोडा जातो, आणि त्यावर स्वार होता. आणि तो म्हणाला, "त्याच्या हातात एक धनुष्य होते. आणि त्याला त्यानंतर एक मुकूट देण्यात आला." हे सर्व त्या शिक्क्यात होते.

46 आणि कोकरा पुन्हा मागे वळतो, आणि आणखी एक शिक्का उघडतो, आणि येथे एक काळा...एक लाल घोडेस्वार निघतो. "आणि त्याच्या हातात एक—एक तरवार दिली होती. आणि तो युध्द करण्यास जाणार होता; आणि त्याला मोठे सामर्थ्य देण्यात आले होते, आणि तो पृथ्वीवरुन शांती हरण करुन घेईल आणि एक दुसऱ्याच्या वध करील." ती एक प्रकारची...अजूनही रहस्यमय गोष्टच आहे. (ही होती की नाही?) जेव्हा त्याने तो उघडला तो पर्यंत.

47 आणि अशाप्रकारे क्रम चालू राहतो, आणि म्हणाला, "ह्या दिवसात ह्या सात मेघगर्जनांच्या अगोदर येथे सर्व रहस्ये प्रकट होतील."

48 आता पाहा. जसे आपण अभ्यास करताना पाहीले की, ह्या युगांमध्ये आपल्याला सुधारक होते, संदेष्टे नव्हते. सुधारक! आणि प्रत्येक कार्यालयाचे स्वत:चे—स्वत:चे काम असते.

49 ठीक तसेच जसे एक मनुष्य टेलिफोन ऑपरेटर आहे, तो पूर्णरितीने इलेक्ट्रीशियन (विजेचे काम करणारा नाही). कदाचित तो थोडे बहुत विजेचे काम करु शकतो. आणि त्याचप्रकारे जर एक व्यक्ति लाईन मॅन आहे, तर तो निश्चितच...जर कोणी व्यक्ति मोठे खड्डे खोदण्याचे काम करतो, आणि त्याने कधीच लाईनमॅनचे काम केले नाही, तर त्याने त्या लाईनमॅनच्या कामापासून दूर राहावे, परंतु तो कदाचित थोडेसे तार जोडण्याचे काम किंवा काही इतर काम करु शकतो.

50 परंतु जेव्हा अंतिम दिवसात, मंडळीच्या युगाच्या अंतिम भागात खऱ्या गोष्टी प्रकट होणार आहेत, परमेश्वराने सांगितले आहे की वचनाप्रमाणे तो आपल्याकडे कोणालातरी पाठविल. आणि आपण त्याचा बारकाईने शोध घेतला, की त्याने भाकीत केले की एलियाचा आत्मा कुणा व्यक्तिमध्ये पुन्हा येईल. आता, मला वाटते हे पूर्णतः स्पष्ट करण्यात आले आहे...आणि आपण ह्या अंतिम दिवसांत त्या अभिषिक्त व्यक्तिच्या येण्याची वाट पाहत आहोत. आता तुम्ही खूप धर्मांधाच्या आणि इतर सर्व गोष्टी ऐकत आहात, परंतु त्या केवळ—केवळ प्रयत्न करीत आहेत...तो सैतान आहे, जेव्हा तो अभिषिक्त वास्तवात येईल, तेव्हा तो लोकांना ह्यापासून दूर नेण्याचा प्रयत्न करीत आहे, समजले. परंतु त्याची व्यवस्थित ओळख करुन दिली जाईल. तुम्हाला माहीत आहे की एलिया कोण होता; आणि त्याकडे लक्ष द्या, आणि तुम्हाला समजेल. आणि जेव्हा तो येईल....आता, निवडलेलेच त्याला ओळखतील.

51 आणि दुसरे; निश्चितच त्याला ओळखू शकणार नाही. ते लाखो मैल त्यापासून दूर जातील. आपण ह्या सर्वांचा अभ्यास केला आणि दाखवले की कशाप्रकारे त्यांनी योहानाला ओळखले नाही, त्यांनी कशाप्रकारे एलियाला ओळखले नाही, ते कशाप्रकारे येशूला ओळखण्यास चुकले, कशाप्रकारे ते ह्या सर्वांना ओळखण्यास चुकले. आणि ते त्याच गोष्टी आताही करतील, कारण बायबल सांगते की ते तसेच करीतील. समजले? म्हणून त्या समयी तो खूप लीन असेल. ते खूप साधे असेल. ज्यामुळे लोक त्यापासून दूर होतील. त्यांच्यासाठी ते इतके साधे असेल. आपण पाहीले आणि नेहमीच असे झाले

आहे जेव्हा लोक हुशार आणि शिक्षीत होतात, आणि त्यांना खूप ज्ञान प्राप्त होते,...ते अशाच प्रकारे हे गमावतात. समजले?

52 येशूने अशाप्रकारचे लोक त्याचे शिष्य म्हणून कधीच निवडले नाहीत. त्याने अशिक्षित लोक, मासेमारी करणारे निवडले, आणि त्यातील कोणीही त्यांच्या मंडळीशी किंवा इतर गोष्टीशी संबंधित नव्हते. त्याच्याकडे अगदी सामान्य लोक, जकातदार, आणि शेतकरी, आणि मासेमारी करणारे, आणि असेच इतर त्यांचे काम करण्यासाठी होते. समजले? कारण त्यांना—त्यांना माहीत होते की ते कुणीच नाही; मगच तो त्यांच्यातून काहीतरी बनवू शकतो. जोपर्यंत ते समजतात की ते काहीच नाहीत, तोपर्यंत देव काम करु शकतो.

53 परंतु, जेव्हा ते विचार करु लागतात की त्यांना काहीतरी माहीत आहे, तेव्हा, "तुम्हाला काहीच माहीत नाही जे तुम्हाला माहीत असायला पाहीजे," असे बायबल सांगते. आणि म्हणून आपल्याला—आपल्याला ते समजते.

54 आणि आता आपण पाहतो की, तेव्हा, ती रहस्ये प्रकट केली जातील.

55 आणि का ते इतर पुरुष, वेस्ली, लुथर आणि ते थोर सुधारक, ज्यांनी न्यायीकरण, पवित्रीकरण, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यासह पेंटेकॉस्टल युग आणले आणि अशा गोष्टी आणल्या, ते हे—हे संदेश का ग्रहण करु शकले नाहीत? ते त्यांना का कळले नाही? कारण ते सुधारक होते. समजले?

56 त्याचप्रमाणे, दुसऱ्या बाजूला पाहा, तेथे काही लोक होते ज्यांच्याकडे, "राजासारखे सामर्थ्य होते, परंतु ते राजे नव्हते." समजले? समजले? तुम्हाला बायबलची कुठल्याही गोष्टींवर परिभाषा पाहावी लागेल. समजले? आता पाहा. परंतु, हेच कारण होते की ह्यांचे सर्व उद्दीष्टे, न्यायीकरणाचा रहस्यमय भाग, पवित्रीकरणाचा रहस्यमय भाग, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याचा रहस्यमय भाग ह्यात भटकले. आणि का, कशाप्रकारे...हव्वेने सफरचंद खाल्ले का, किंवा तिने डाळिंब खाल्ले, किंवा काहीतरी खाल्ले? पाहीले...सर्पवंश काय आहे? आणि—आणि बाप्तिस्मा "पिता, पुत्र, पवित्र आत्म्या" च्या नावात बरोबर आहे की "प्रभू येशूच्या" नावात बरोबर आहे? आणि ओह, अशा शेकडो गोष्टी, अनुत्तरीत सोडल्या. समजले?

57 आणि तेव्हा शेवटच्या तासाला, हा व्यक्ती येणार होता आणि ह्या गोष्टी प्रकट करणार होता; पाहा, शास्त्रलेख घ्या. ते व्यवस्थितरितीने तुम्हाला कळेल. पाहा. होय, महाशय. आणि, आता, ती मोठी, महान गोष्ट असणार नाही. बायबलमध्ये येथे ते काहीतरी मोठे असल्यासारखे भासत आहे.

58 ती किती मोठी होती, जेव्हा योहान तेथे बाप्तिस्मा करण्यासाठी येणार होता. आता ह्यावर जरा विचार करा. संदेष्टे, फार पूर्वी, यशया, मलाखी आणि त्यांच्यातील सर्वजण त्याच्याविषयी बोलले की तो कधी येईल. आणि जेव्हा तो आला, केवळ एकटा, वृध्द, अशिक्षित व्यक्ति, त्याच्या पूर्ण चेहऱ्यावर दाढी असलेला आणि एका बारीक लव असलेल्या किड्यासारखे केस चिकटलेले असलेला, आणि त्याच्या सभोवती एक मोठे मेंढ्याचे कातडे पांघरलेला; बिलकुल शिक्षण नसलेला, त्याच्या आयुष्यात एकही दिवस शाळेत न गेलेला, जितके आपल्याला माहीत आहे. पाहीले? येथे तो, अरण्यातून आला, मंचावर स्वागत करण्यासारखाही तो नव्हता, आणि यार्देन नदीच्या तेथे उभा राहीला आणि लोकांना पश्चाताप करण्यासाठी बोलावू लागला. तुम्ही कल्पना करु शकता काय!

59 बायबल सांगते की, "त्या दिवसात सर्वगोष्टी इतक्या महान असतील की सर्व उंच स्थाने सखल केली जातील आणि सर्व सखल स्थाने उंच केली जातील." होय महाशय. "आणि सर्व खडकाळीचे मैदान होवो."

60 का, मी तेथे बाहेर लोकांना पाहून कल्पना करु शकतो, मी विचार करु शकतो की, योहान किंवा ख्रिस्ताचा महान आद्यदूत बाहेर निघून येतो, आणि तो सर्व वाळवंट घेतो आणि ते सपाट करीतो आणि त्यावर पुन्हा गवत उगवेल? समजले? ओह, मी कल्पना करु शकतो, की लोकांनी त्याच्याविषयी आपल्या कल्पना कायम केल्या होत्या, की आजही लोक करीत आहे.

61 परंतु तो इतका नम्र होता, की प्रेषितांनीही त्याला ओळखले नाही. ते म्हणाले, “ठीक आहे, शास्त्रलेख असे का म्हणत आहे...तुझे तेथे आता अर्पण केले जाणार आहे? शास्त्रलेख असे का सांगत आहे, की—की एलिया प्रथम आलाच पाहीजे?”

62 तो म्हणाला, “तो तर आलाच आहे, आणि तुम्ही त्याला ओळखले नाही. आणि, मनुष्याच्या पुत्राचे, ते तसेच करतील. परंतु,” तो म्हणाला, “योहानाने तेच केले जे त्याच्याविषयी लिहीले होते. आणि त्यांनी त्याच्या बरोबर तेच केले जसे त्यांनी करण्याचे ठरवले होते.” आणि, म्हणाला, “मनुष्याचा पुत्र दु:ख भोगेल.”

63 का, असे नव्हते, मला वाटते यहुद्यांतील एक तृतीयांश लोकही नव्हते. जे जाणत होते की येशू ख्रिस्त पृथ्वीवर आहे...त्यांनी कदाचित काही धर्मांध गोष्टी कोठेतरी ऐकल्याही असतील, परंतु त्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. ते असेच करीत राहीले. “तो त्याच्या स्वकीयांकडे आला आणि त्यांच्या स्वकीयांनी त्याचा स्विकार केला नाही.” आता, येथेच मी विश्वास करीतो की...आता असे सांगितले गेले नाही की तो गुप्तरितीने येईल.

64 परंतु स्वर्गरोहण गुप्तरितीने होईल. म्हणून जर जेव्हा तो आला, जर हे गुप्तरितीने झाले, तर स्वर्गरोहण किती गुप्तरितीने होईल! समजले? त्यांना ते समजणार नाही. ते थेट असे म्हणतील, “अच्छा, मला वाटते आपले स्वर्गरोहण व्हायला पाहीजे होते. आणि हा सर्व न्याय पृथ्वीवर येणार होता?”

65 तो म्हणेल, “ते अगोदरच झाले आहे, आणि तुम्हाला ते कळले नाही.” समजले? ते तसेच असेल. जसे एक चोर रात्री येतो.

66 जसे एकदा—एकदा पुस्तक वाचले. त्या पुस्तकाला काय म्हणतात? *रोमियो आणि ज्युलियट* काय हेच आहे, जे ते पुस्तक आहे, की दुसरे कुठले आहे? त्याने कसेतरी घराला शीडी लावली...खूप समय झाला. आणि तिला बाहेर घेऊन जाण्यासाठी रात्रीच्या समयी तो आला.

67 आता, त्याचप्रकारे हे—हे घडेल, आणि ती निघून जाईल. परमेश्वर स्वर्गदूताच्या समुहाला फावड्यांसह खाली पाठवणार नाही, की त्यांनी कबरा खोदाव्या. बायबल सांगते, “आपण डोळ्याचे पाते लवते न लवते क्षणात बदलले जाऊ.” ते इतके त्वरेने होईल की ते क्षणात पूर्ण होईल.

तेव्हा असे म्हणतील, “कोणी अदृश्य झाले.”

68 ठीक आहे, मी कल्पना केली की जर आपण संपूर्ण जगात आज शोधले तर, आपल्याला कळेल की प्रत्येक दिवशी हया पृथ्वीवर पाचशे लोक दिसेनासे होतात, त्यांच्या विषयी कोणाला काहीच कळत नाही. ते येतात, दिसेनासे होतात.

हे खरे आहे, की स्वर्गरोहण होणारे लोक खूप जास्त नसणार.

69 आणि, मी तुम्हाला घाबरवू इच्छित नाही, आणि मला—आणि मला—मला—मला—मला, तसे वाटत नाही, परंतु मी फक्त तुम्हाला सांगू इच्छितो जे त्याने सांगितले आहे. आणि तुम्हा स्वतःलाही ते माहीत आहे. “जसे नोहाच्या दिवसात होते जेव्हा आठ

आत्मे पाण्यातून वाचविण्यात आले. जगातून आठ आत्मे. जगातून आठ आत्मे पाण्यातून वाचविण्यात आले होते."

70 ठीक, तुम्ही म्हणाल, "ओह, माझ्या प्रभू! मला माझे प्रयत्न करण्याची काही गरज नाही." ते दाखविते की तुमच्याकडे त्या प्रकारचा पुरेसा विश्वास नाही.

71 जर तेथे कोणी जाणार—जाणार असेल, तर तो मी आहे, आमेन. कारण मी विश्वास करतो. समजले? त्याचप्रकारे तुमचा विश्वास असला पाहीजे की, "तो मी असेन." निश्चितच. मी त्याच्या इतका जवळ राहू इच्छितो, की मला कळेल जेव्हा तो येईल तो मला घेऊन जाईल. मी त्यावर विश्वास ठेवतो. ते बरोबर आहे. म्हणून जर...जर इतर सर्व ते चुकतात, त्याच्या कृपेद्वारे, मी तेथे असणारच. कारण त्याने मला तसे अभिवचन दिले आहे, आणि मला ठाऊक आहे की मी तेथे असणार, कारण तो खोटे बोलू शकत नाही. आणि माझा आत्मा आणि जीवन ह्याची साक्ष देतात आणि मी रोज असे जगण्याचा प्रयत्न करतो जसे काही तो येत आहे म्हणून तो एक मी असणार त्याचप्रकारे तुम्हाला वाटले पाहीजे, "जर तेथे त्यात जाणारे आठ व्यक्ति असतील, मी त्या आठांतील एक असेन; पाचशे जण जाणार असतील, तर मी त्या पाचशे जणांतील एक असेन. मला दुसऱ्या व्यक्तिबद्दल माहीत नाही, परंतु मी त्या पाचशे जणांमधील एक असू इच्छितो." समजले? अशाचप्रकारे तुम्ही ह्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहीजे. समजले?

72 आणि जर तुम्ही अशाप्रकारे लक्षात ठेवणार नाही, तर तुमच्या विश्वासात काहीतरी चुकीचे आहे. समजले? म्हणजे तुमचे तारण झाले आहे. ह्याविषयी तुम्हाला अजूनही खात्री नाही. तुम्ही त्याचा फक्त अनुमान करीत आहात. तसे करु नका. ठीक आहे.

73 आपण ह्या शिक्क्याचा अभ्यास करण्यास जाणार नाही, काय आपण जाणार नाही? ठीक आहे...मला ठाऊक नाही की तुम्हाला वाईट वाटेल, जर मी तुमचा जास्त वेळ घेतला. आपण येथून थोडे लवकर निघू शकू. तिथे...

74 लक्षात ठेवा, ह्या शिक्क्यांच्या प्रकटीकरणात वास्तवाच हे एकच वचन त्याविषयी आहे. पहिले वचन घोषणेविषयी सांगते, दुसरे वचन शिक्क्याविषयी सांगते. मी बहुतेक समालोचन आणि दुसरे लेख जे ह्या शिक्क्यांवर दिले गेले आहे ते वाचले आहेत. किंवा त्यांच्या विचारांना वाचले आहे, आणि मी त्या इतरांसारखाच नेहमी विश्वास ठेवला, की तो पहिला घोडेस्वार पहिली मंडळी आहे. परंतु जेव्हा पवित्र आत्म्याने ते प्रकट केले, ते पूर्णतः त्याच्याविरुध्द होते. आणि म्हणून तेव्हा, त्याचप्रकारे त्याने सर्वांना प्रकट केले की ते काय आहेत. आणि मग मी प्रयत्न करीन...

75 आता, हे माझ्यासाठी अति पवित्र आहे. हेच कारण आहे की मी ह्या प्रश्नाची उत्तरे देणार आहे. आणि आता तिसरा शिक्का पाहूया, सर्वजण स्पष्टपणे जाणतात, आणि हे टेपवर आहे, जेणेकरुन आता सर्वांना समजेल. समजले? मी आजरात्री, थोडा वेळ पार्श्वभूमी बोलण्याचा प्रयत्न केला, ह्यासाठी की लोकांना कळावे...

76 धक्का–बुक्की तुम्ही करता कामा नये, समजले? परंतु जेव्हा तुम्ही ते करता हा एक मानवी स्वभाव आहे. आणि येथे—येथे फार गर्मी आहे, आणि तुम्ही—आणि तुम्ही बैचेन झाला आहात.

77 परंतु तुम्ही खूप, खूप चांगले आहात. मी आज पर्यंत पाहिलेल्या सर्वात चांगली ही सभा आहे, येथील लोकांची वागणूक, आणि शांततेने बसणे, आणि जेव्हा मुले रडायला लागली तेव्हा मातांनी त्यांच्या बालकांना या शिशू कक्षात नेले. आणि सर्वगोष्टी खुप चांगल्या होत्या.

78 परंतु मी येथे पार्श्वभूमी सांगण्याचा तोपर्यंत प्रयत्न करीन जोपर्यंत ही वचने सांगण्यासाठी आत्म्याचा अभिषेक होत नाही. आणि जर मी ते करताना कुठेतरी चूक केली असेल. जर मी येथे चूक केली असेल, तर खात्रीने येथे, सर्व लोकांच्या समक्ष तो ती माझ्यासाठी सुधारेल. माझी—माझी तशी इच्छा आहे...माझी इच्छा आहे की ती बरोबर व्हावी. तेथे ते तुम्ही कल्पना करता त्याप्रमाणे घेण्याची आवश्यकता नाही. तेथे काहीतरी बरोबर आहे, आणि—आणि आम्हाला तेच पाहीजे. आमची इच्छा आहे की देवाने ते द्यावे जे बरोबर आहे.

79 म्हणून आता आपण ह्या स्वारांना पाहूया, जेव्हा ते बाहेर येतात. आता पहिला घोडा जो बाहेर येतो, आणि आपल्याला समजले की तो ख्रिस्तविरोधी होता. आणि मग, मागील रात्री आपण पाहिले की, तो व्यक्ति जो ख्रिस्तविरोधी म्हणून बाहेर आला, एका पांढऱ्या घोड्यासमान, आपण त्याला हातात तरवार घेऊन लोकांचा वध करताना पाहीले.

80 आता, तेथे नेहमीच दैहीक आणि आत्मिक आहे. आणि आपण हा शिक्का फोडण्या अगोदर मंडळी करिता मी हे दर्शकाच्या रुपात सांगू इच्छीतो.

81 त्याने मला जे काही दिले ते मी येथे लिहून ठेवले. माझ्याकडे येथे कित्येक शास्त्रलेख आहेत, त्याची सात किंवा आठ पाने, आणि मी त्यांचा संदर्भ देतो.

82 लक्ष द्या, मी एक मंडळीचा नमुना देऊ इच्छितो, आणि ते इतके स्पष्ट करतो की तुम्ही ते पाहण्यासाठी बांधले जाल. समजले?

83 आता, एदेन बागेत एक स्वाभाविक वधु होती. मागील रात्रीच्या संदेशाचे स्मरण आहे? ती स्वाभाविक वधू, ती आदामाची प्रेयसी होती, अजूनही त्याची पत्नी नव्हती. कारण त्याने तिला अजूनही पत्नी म्हणून जाणले नव्हते.

84 जशाप्रकारे मरीया योसेफाची पत्नी होती, परंतु त्याने तिला अजूनही जाणले नव्हते. "ती गर्भवती होती." समजले?

85 आता, आदामाने त्याच्या पत्नीस जाणण्याअगोदर, ती त्याच्यासाठी केवळ एक वधू होती. ठीक आहे. आणि आपण पाहतो की देव...एदेन बागेत तीचे पतन झाले कारण ती देवाचे वचन धरण्यास असमर्थ ठरली.

86 आता, त्याला माहीत होते की सैतान त्यांच्यामध्ये येईल, म्हणून त्याने त्यांना एक—एक जागा दिली की ज्याच्यामागे त्यांनी राहावे, त्यांच्याभोवती तटबंदी केली होती. तेथे, तटबंदी करण्यासाठी परमेश्वराखेरीज कोण अधिक ती चांगली जागा जाणू शकतो, जर तो त्याच्या स्वतःच्या लेकरांची काळजी घेण्याचा प्रयत्न करतो?

87 जर मी माझ्या छोट्या जोसेफची काळजी घेऊ इच्छितो, तर भावा, सर्वकाही... आणि मला माहीत आहे त्याचे जीवन त्याच्यावर अवलंबून आहे, का मी...आणि मी ते करण्यास समर्थ आहे. ठीक आहे. जर त्याच्यात सुरक्षिततेसाठी चाळीस फूट कॉक्रीट, पोलादाच्या जाळीने अधिक मजबूत केलेल्या जाळीची आवश्यकता असेल, तर मी ते अधिक खात्रीसाठी, नव्वद फूटाची, करेन.

88 आणि जर मी माझ्या लहान मुलासाठी इतका विचार करु शकतो, (ज्याचा जर त्याच्या मरणाधीन जीवनाचा नाश होऊ शकतो, मी विश्वास करीतो की तो वाचेल) तर परमेश्वर त्याच्या लेकरासाठी त्याचा सार्वकालिक नाश होऊ नये म्हणून किती अधिक करील! तो त्याला कशामागे लपविल? तो त्याला त्याच्या स्वतःच्या वचनामागेच ठेवील. जोपर्यंत तुम्ही त्या वचनात मध्ये आहात, तुम्ही सुरक्षित आहात. "जर तुम्ही मजमध्ये, आणि माझी वचने तुम्हामध्ये, तर तुम्ही तुमच्या इच्छेप्रमाणे मागा." हे त्याचे वचन आहे.

89 म्हणून, हव्वा बागेत हिंडत होती, आणि ती सर्पाकडे धावत गेली, जो फार सभ्य व्यक्तीत्वाचा होता...आणि...आता तो पलिकडच्या बाजूस होता. परमेश्वर नम्रतेत राहतो, वास करतो, कामही करतो, तो कधीही कोणत्या दुसऱ्या मार्गाने कार्य करीत आहे. समजले? आता तेथे एक लहान, नम्र युवती फिरत होती. आणि तेथे सैतान एक बुध्दीमान सरळ, फार सभ्य व्यक्तीच्या रुपात येतो. आणि सैतानाला तिला आपली योजना विकायची होती. जितपर्यंत...

90 सैतान कितीही चारी बाजूला असेना, जोपर्यंत हव्वा ह्या वचनाच्या मागे होती, तोपर्यंत ती सुरक्षित होती. [भाऊ ब्रॅन्हम त्यांच्या बायबलवर थाप मारतात—सम्पा.] समजले? म्हणून सैतानाला जे हवे ते करु द्या, तुम्ही वचनाबरोबर राहा. जराही वचनापेक्षा वेगळे काही करु नका.

जर तो म्हणतो, "तु का आजारी आहेस."

"त्याला बसलेल्या माराने मी बरा झालो आहे."

"ठीक आहे, तू मरणार आहेस."

"तो मला, पुन्हा उठवील. त्याने ते अभिवचन दिले आहे."

91 पाहा, फक्त वचनाच्या आड उभे राहा. तेच सर्वकाही आहे. स्वत:, ख्रिस्तानेही वचनाचा आश्रय घेतला. "असे लिहीलेले आहे." समजले? आता, वचनाच्या मागे उभे राहा.

92 परंतु, हव्वा, तीचे एक प्रकारे पतन होत होते, परंतु ती पूर्णत: खाली पडली नव्हती. तीने फक्त एक लहानशा गोष्टीला खाली केले होते. आणि तेच तिने करावे अशी सैतानाची इच्छा होती. त्याने तर्कवितर्कद्वारे तिला वचनाच्यामागून हटवले होते.

देवाच्या वचनावर कधीच तर्कवितर्क करु नका. फक्त त्यावर विश्वास ठेवा! समजले?

93 म्हणून, ती तेथून बाहेर आली. आणि आदाम तिच्याजवळ येण्याआधी, तिचा पत्नी म्हणून स्विकारण्याआधीच, ती सैतानाद्वारे अगोदरच भ्रष्ट झाली होती. आणि ती...

94 आणि तुम्ही लक्ष दिले का? ख्रिस्तानेही बरोबर तीच गोष्ट केली. आता, सोडविण्यासाठी परमेश्वराला प्रथम तेथे असणे आवश्यक होते. तुम्ही ह्यावर लक्ष दिले का? मरिया, योसेफाकडे येण्यापूर्वी, पवित्र आत्म्याने तेथे छाया केली होती. आमेन. समजले? हेच ते आहे जेथे सोडविणारा येतो.

95 आता, आता लक्ष द्या, स्वाभाविक स्त्रीचे पतन झाले; आणि परमेश्वराने तिला सोडविण्याकरिता एक मार्ग बनवला. जरी ती पडली होती, तरी त्याने एक मार्ग बनवला.

96 आता, ती पृथ्वीवरील पहिली वधू होती. तिचा पती तिच्याकडे येण्याअगोदर आणि त्यांचा विवाह होण्याअगोदर तिचे पतन झाले होते. तिचे पतन वचनावर तर्क-वितर्क केल्यामुळे झाले, वचनावर स्थिर राहण्याऐवजी तिने तर्कवितर्क केला. तिचे पतन झाले. आणि पतनामुळे तिच्यावर मृत्यु आला, अनंतकाळासाठी विभक्त झाली. तिच्याबरोबर तिने तिचा पती आणि पृथ्वीवर ज्या इतर सर्व गोष्टी पतीत केल्या. तीचे पतन झाले.

97 आता, परंतु, परमेश्वर जो दयेने भरलेला आहे, त्याने त्या स्त्रीला सोडविण्यासाठी एक मार्ग केला. आणि आता त्याने तिला अभिवचन दिले आहे. तिला सांगितले आहे की, कधीतरी, भविष्यात सत्य वचन तिच्याकडे पुन्हा येईल. सत्य वचनाची तिला ओळख दिली जाईल. आता ते लक्षात ठेवा. कारण, त्याने एका स्त्रीद्वारे, ख्रिस्ताचे अभिवचन दिले आहे.

98 आणि ख्रिस्तच वचन आहे. संत योहान पहिला अध्याय, “प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता, आणि शब्दच देव होता. आणि शब्द देहधारी झाला,” समजले “आणि आम्हामध्ये वस्ती केली.” परमेश्वराने देहामध्ये आमच्याबरोबर वस्ती केली. तो शब्द होता.

99 शब्दाअगोदर तो एक विचार होता. आणि विचार निर्माण करावा लागतो. ठीक आहे. म्हणून, परमेश्वराचे विचार जेव्हा उत्पत्ती झाले, जेव्हा ते शब्दाद्वारे, बोलले गेले. तेव्हा त्याने ते तुम्हाला विचार, त्याचे विचार, म्हणून सादर केले, आणि ते तुम्हाला प्रकट केले आहेत. तुम्ही बोलेपर्यंत *ते* विचारच असतात…ह्या कारणांमुळे…

100 मोशे प्रार्थना करण्यासाठी गेला. तो अग्नी स्तंभ त्याच्या सभोवती होता, आणि तो म्हणाला, “जा, तुझी काठी पूर्वेच्या दिशेने धर, आणि ‘गोमाशा’ बोलाव.”

101 तेथे गोमाशा नव्हत्या. परंतु तो गेला आणि त्याने तेथे काठी धरली, आणि म्हणाला, “तेथे माशा येवोत.” तेथे अजूनही गोमाशा नव्हत्या. मागे गेला. परंतु शब्द, परमेश्वराच्या विचारात, अगोदरच बोलेला गेला होता. तो शब्द आहे, आता तसे घडलेच पाहीजे.

102 आता तुम्हाला ठाऊक नाही जेथे येशू म्हणाला? “जर तुम्ही ह्या डोंगराला म्हणाल; मी सांगतो म्हणून नाही. परंतु *तुम्ही* ह्या डोंगरास म्हणा, ‘येथून उपटला जा.’”

103 आणि मला वाटते, मोशेच्या वेळेला जी प्रथम गोष्ट घडली, हिरव्या रंगाच्या माश्या भणभणू लागल्या असतील. आणि थोड्याच वेळानंतर, त्या प्रति पटांगण पाच पाऊंड होत्या. समजले? त्या कोठून आल्या? त्याने…परमेश्वराने त्यांना निर्माण केले. काय तुम्ही पाहत नाही कसे…

104 परमेश्वर हे जग आज रात्री मच्छरांद्वारे, नष्ट करील, जर त्याची इच्छा असली तर. ठीक, तो मच्छरांचा ओळंबा चंद्रापर्यंत नेऊ शकतो. तो हे फक्त एक गोष्ट करु शकतो, की फक्त त्याने हे बोलावे. “तेथे चंद्रापर्यंत मच्छर होऊ दे.” तेथे हे सर्व केले जाईल. कुठलाही रासायनिक पदार्थ किंवा काही नाही. ते फक्त वाढत, वाढत, वाढत जातील. समजले?

105 त्याला जे पाहीजे ते तो करु शकतो. तो परमेश्वर आहे. निर्माणकर्ता आहे. त्याला एकच गोष्ट करावी लागेल, ते म्हणजे शब्द बोलावा लागेल. [भाऊ ब्रॅन्हम त्याच्या बोटाने एकदा टिचकी वाजवतात.—सम्पा.] ते बरोबर आहे. तो निर्माणकर्ता आहे. आता, जर आपल्याला ते कळेल की तो किती महान आहे! समजले? तो त्याच्या इच्छेस येईल ते करतो.

106 परमेश्वर तेथे वर बसला आहे आणि लोकांकडे पाहतो. आणि हे शिक्षीत, चालाख लोक म्हणतात, “तेथे कोणी परमेश्वर नाही,” आणि—आणि अशा सर्व गोष्टी. ओह! का, ते पुन्हा तसेच नाहीत जसे बाबेलात होते.

107 आता आपण पाहीले की देवाने हव्वेला म्हटले, की, “एवढ्या मोठ्या समयानंतर वचन तुझ्याकडे परत येत आहे.” आता, ती कशी पडली? माझी इच्छा आहे की माझ्या ह्या लोकांनी ते सांगावे कशापासून ती पडली? कशापासून ती पडली होती? वचनापासून ते बरोबर आहे का? [मंडळी म्हणते, “वचनापासून”—सम्पा.] वचनापासून. आणि देव म्हणाला की तो पुन्हा तिला वचनाकडे आणण्यासाठी एक मुक्तीचा मार्ग करील. ठीक आहे एवढ्या मोठ्या काळानंतर वचन तिला कळवले जाईल. ठीक आहे. आता वचन, एका उद्देशासाठी आले आहे. मी जे सांगत आहे. ते घट्ट धरुन ठेवा. वचन तिच्याकडे एका उद्देशाने आले, ते मुक्तीसाठी आले. हे ठीक आहे.

108 परंतु तोपर्यंत—तोपर्यंत, तिच्याकडे एक पर्याय होता मुळ वचनाकडे येईपर्यंत ते कार्य करील. आता तुम्हाला स्पष्टपणे कळले का? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] समजले? त्याने तिला म्हटले वचन तिच्याकडे पुन्हा येईल, परंतु, त्या समयापर्यंत, त्याने तिला एक पर्याय दिला, तो समय येईपर्यंत. म्हणून, त्याने तिला, त्या रक्ताचा पर्याय म्हणून, अर्पिण्यासाठी एक अर्पण दिले.

109 आता, ते रक्त बैलाचे आणि मेंढराचे, आणि बकऱ्याचे आणि अशाच गोष्टींचे होते, परंतु त्यांनी तिचे पाप नष्ट झाले नाही. समजले? त्याने फक्त तिच्या पापावर पांघरुण घातले. त्याने त्यांची पापे मुळीच दूर झाली नाहीत. त्यावर पांघरूण घातले. कारण ते प्राण्यांचे रक्त होते. आणि प्राण्यांच्या रक्तात प्राण्यांचे जीवन आहे. तो एक पर्याय होता. जोपर्यंत खरे येत नाही…आता तुम्ही आपले अंगरखे घाला.

110 वास्तविक मनुष्याचे रक्त, मनुष्याप्रमाणे, शरीर संबंधाद्वारे नाही तर देहधारी (परमेश्वर) झाले. कुमारी, एका कुमारीकेतून उत्पन्न झाला. आता देवाचा शब्द, देवाचे अभिवचन, रक्त बनले, आणि ते एक मनुष्य येशू ख्रिस्त उध्दारकर्तामध्ये देहधारी झाले. "बैलांचे आणि बकऱ्यांचे रक्त, आणि इत्यादि…"

111 परंतु आता थांबा. येथे परमेश्वराने अभिवचन देऊन सांगितले की, जेव्हा तो येईल तेव्हा असे होईल. "तिचे बीज त्या सर्पाचे डोके फोडील." आता, जर तिचे बीज त्याचप्रकारे आदामापासून अथवा त्याचप्रकारे सर्पापासून आले आणि तशाप्रकारे, तर ते अजूनही पापाचे बीज असते.

112 ह्याच कारणामुळे योहान रडला. तेथे कोणीही मनुष्य नव्हता. कारण…प्रत्येकजड त्या खंदकाच्या दरीच्या दुसऱ्या बाजूला होता. परंतु तेथे एक समय येणार होता. जेव्हा हे प्राण्याचे पर्यायी रक्ताऐवजी देहधारी झालेले खरे रक्त येणार होते. परमेश्वराने, मांस आणि रक्त बनविले. बायबल सांगते तो होता. पहिले तीमथ्य. 3:16, "सुभक्तीचे रहस्य निर्विवाद मोठे आहे: कारण परमेश्वर देहाने प्रकट झाला." ते बरोबर आहे. कुमारीद्वारे झालेल्या जन्माने हे केले.

113 आता मेंढ्यांचे आणि बकऱ्यांचे रक्त पाप झाकीत होते, परंतु त्यापासून ते सोडवीत नव्हते. कारण ते प्राण्यांचे रक्त होते. परंतु ते एक पर्याय म्हणून ठीक होते.

114 आणि त्यांना निश्चितच त्या पर्यायाची सवय झाली—झाली, आणि म्हणून त्यांनी ते चालू ठेवले.

115 आणि, जेव्हा, वास्तवात, अभिवचनाचे वचन येशू ख्रिस्तामध्ये प्रकट झाले, जो त्या महान निर्माणकर्त्या, देवाचा पुत्र म्हणून सिध्द झाला; आणि त्याने स्वत: ला, देवाच्या जीवंत वचनाद्वारे, प्रकट केले होते. त्याने सिध्द केले की तो परमेश्वर होता. तो बोलण्याद्वारे गोष्टी अस्तित्वात आणू शकत होता.

116 तेथे कोणीही मनुष्य किंवा—किंवा जगामध्ये कोणीही नव्हता. जे ते करु शकत होते. पृथ्वीवर कोणतीही गोष्ट हे करु शकत नव्हती, परंतु परमेश्वर. सैतान निर्माण करु शकत नव्हता. तो निर्माण केलेल्या गोष्टी बिघडविणारा आहे, परंतु तो निर्माण करु शकत नाही. पाप हे नितीमत्त्वाची विकृती आहे. तुम्हाला समजते मला काय म्हणायचे आहे. खोटे काय आहे? ते विपर्यास केलेले सत्य आहे. समजले? व्यभिचार काय आहे? खरी कायदेशीर कृती विकृत करणे. पापांतील सर्व गोष्टी, पाप हे विकृत केलेले सत्य आहे. आता, तो निर्माण करु शकत नाही.

117 परंतु जेव्हा ख्रिस्त आला, त्याने सिध्द केले की तो निर्माणकर्ता होता. ते रक्त होते. ज्याविषयी अभिवचन दिले होते. आता जर तुम्ही ते वाचू इच्छिता...आपण काही मिनिटासाठी वळूया. आपण आजरात्री ह्यावर कसेही करुन काही वेळ देणार आहोत. मी...

118 हे मला चिंताग्रस्त करते. मला वाटते सर्वजण घरी जाऊ इच्छितात. तुम्हाला माहीत आहे...[मंडळी म्हणते, "नाही."—सम्पा.] आता आपण प्रेषित 2 मध्ये जाऊया. मी तुमचा आभारी आहे. आणि आम्ही फक्त...

119 प्रेषित 2, आणि आपणाला समजेल की हे खरे आहे किंवा नाही. त्याने हे सिध्द केले किंवा नाही की तो देव होता. ठीक आहे. प्रेषित 2 पाहा. आता येथे 22वे वचन पाहूया. पेत्र पेंटेकॉस्टच्या दिवसात बोलतो.

> *अहो इस्त्राएल लोकांनो, ह्या गोष्टी ऐका, नासोरी येशूच्याद्वारे देवाने जी महत्कृत्ये अद्भूते व* चिन्हे *तुम्हाला दाखविली त्यावरुन देवाने तुम्हाकरिता पटविलेला असा तो मनुष्य होता, ह्याची* तुम्हाला *माहीती आहे.*

120 "देवाने तुम्हाकरिता पटविलेला असा तो मनुष्य होता." त्याने केलेल्या गोष्टींद्वारे, सिध्द केले की तो परमेश्वर होता. येथे पेत्र सभेत उभा राहून त्यांना सांगत होता.

121 निकदेमास हे माहीत होते. तो म्हणाला, "गुरुजी, आपण देवापासून आलेले शिक्षक आहा, हे आम्हाला ठाऊक आहे, कारण ही जी चिन्हे आपण करिता ती देव बरोबर असल्यावाचून कोणालाही करिता येत नाहीत." समजले? त्यांना ते माहीत होते. परंतु का?

122 आता लक्ष द्या...आता, हव्वेला हे अभिवचन देण्यात आले होते...ती वधू खाली आली, आणि जे खरे वचन तिच्याकडे आले. तेव्हा तिने ते नाकारले म्हणून. त्या स्त्रीने, इब्री वधूने वचनाला ओळखण्याचे नाकारले. कारण ती परमेश्वराची वधू होती; त्याने तिला विभक्त करुन दुर केले. हे बरोबर आहे का? ती परमेश्वराची वधू होती.

123 तुम्ही म्हणाल, "अच्छा, त्याचा अजूनपर्यंत विवाह झाला नव्हता." ते बरोबर आहे. परंतु योसेफ मरियेला सोडण्याअगोदर...त्यांचा विवाह होण्याअगोदर मरियेला सोडणार होता. समजले? त्याचे तिच्याशी वाग्दत्त झाले होते.

124 आणि जेव्हा तो आला, आणि तो शब्द ज्याचे त्याने अभिवचन दिले होते, विवाहाकरिता आला, तेव्हा त्याने तिला तिच्याच पर्यायांमध्ये इतक्या वाईट रितीने पाहीले, की ती खरे अभिवचन जे तिला वचनाने, ख्रिस्ताने दिले होते. ते घेऊ शकली नाही.

125 तुम्हाला हे कदाचित मिळत नसेल. आता मला पुन्हा त्याकडे जाऊ द्या. माझी इच्छा आहे की, तुम्हाला हे कळावे, समजले?

126 तिला (वधूला, हव्वेला) अभिवचन देण्यात आले होते की एक सोडविणारा येईल. तिचा सोडवणूक करणारा वचन असेल. आणि जेव्हा वचन आले, देहधारी झाले. तिने वचनाला नाकारले. तिला पर्याय देण्यात आला होता. आता हे धरुन ठेवा, "पर्याय." सोडविणारा येईपर्यंत देण्यात आला होता. आणि जेव्हा सोडविणारा आला, तिला त्या पर्यायासोबतच राहावे वाटले, आणि खरे वचन तिने नाकारले. ते पाहीले? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] आणि ती इब्री वधू होती.

127 म्हणून त्याने ते दुसऱ्या हव्वेद्वारे, वधू, सर्व आध्यात्मिक जीवनाची आई असे केले. समजले? *हव्वा* म्हणजे, हव्वा म्हणजे "सर्वांची माता"..."सर्व जीवधारीत्म्यांची" *हव्वा,* "सर्व जीवधाऱ्याची माता."

128 आता आणि जेव्हा तो इब्री वधूकडे आला. ती सर्व जे जीवंत आहेत. त्यांची माता होती. परंतु तीने वचन नाकारले.

129 स्वाभाविक ह्या, एदेन बागेत, सैतानाचे तर्कवितर्क जे देवाच्या वचनाविरुध्द होते ते ऐकण्याद्वारे पतीत झाली. त्याचप्रकारे ती पडली. ठीक आहे, महाशय, ती पडली कारण तीने तसे केले.

130 आता आध्यात्मिक हव्वा, जी मंडळी आहे, ख्रिस्ताची वधू तिचे पतन, एदेन बागेत नाही. परंतु रोममध्ये, नाईसिया सभेत झाले, जेव्हा तिने त्या पेंटेकॉस्टल मंडळीला नाकारुन, नाईसिया सभेकडे गेली आणि देवाचे वचन धरण्याऐवजी, रोमी तर्कवितर्क ऐकले, ती पडली. आणि जे काही तिच्या आजूबाजूला होते, ते तिच्याबरोबर मृत झाले. आता, ज्याप्रकारे स्वाभाविक हव्वा पडली, आध्यात्मिक हव्वाही पडली. परमेश्वराची वधू बागेत पडली—पडली; आणि ख्रिस्ताची वधू रोममध्ये पडली. समजले?

131 लक्ष द्या, देवाच्या वचनाविरुध्द तर्कवितर्क करण्याद्वारे, तिने तिचे सद्गुणाचे अधिकार सैतानापाशी गमावले. जे आपण हे शिक्के फोडताना पाहीले की तो सैतान होता. आणि अजूनही तिथे सैतान आहे. बायबल सांगते ते सैतानाचे आसन आहे. आणि जसे हव्वेने तिचे सद्गुणाचे अधिकार गमावले आणि एदेन बागेत सैतानाला दिले. मंडळीने ख्रिस्ताच्या वधूने तीच गोष्ट रोम येथे केली, जेव्हा त्यांनी विशिष्ट शिकवण आणि तर्कवितर्कासाठी बायबल नाकारले. पाहा हे कसले निदर्शक आहे? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.]

132 जर तुम्ही ह्या प्रतिछायांना पाहाल, तर तुम्ही त्यातून बाहेर येण्यास बांधिल आहात. जर माझा हात असा दिसत असेल...जर मी स्वतःला कधीच पाहीले नसेल, आणि मी माझी सावली येताना पाहिली, तर मला कळेल की मी कसा दिसतो. समजले? परंतु, ते तशाचप्रकारे आहे. जर पुढे काय होणार हे तुम्हाला जाणायचे असेल, तर तुम्ही काय घडले आहे त्याकडे पाहा. “कारण...सर्व जुन्या गोष्टी जे पुढे होणार आहे. त्याची छाया आहे.” असे बायबल सांगते, ठीक आहे.

133 कारण तिने तिचे सदाचारी वचन, परमेश्वराचे वचन गमावले, जेव्हा तिने बायबल विकले, आणि तेथे एका मनुष्याला ठेवले, जो म्हणतो की मंडळीला त्यांना जो पाहीजे तो बदल करण्याचा अधिकार आहे. आणि त्यांनी ते केले. आणि ख्रिस्ताची वधू पेंटेकॉस्टलची वधूने तिचा सद्गुण नाईसिया सभेत विकला, ज्याप्रमाणे हव्वेने तिचा सद्गुण एदेन बागेत सैतानाला विकला. त्याचप्रकारे. ठीक आहे.

134 परमेश्वराने ह्या मंडळीला, ह्या पेंटेकॉस्टल मंडळीला अभिवचन दिले, त्याला माहीत होते ती ते करील जसे त्याने हव्वेला केले, परमेश्वराने अभिवचन दिले होते.

135 तुम्ही विश्वास करीता की पेंटेकॉस्टल मंडळीने, तिचा जन्मसिध्द अधिकारांना... तिचा सद्गुण जो तेथे हरवला होता, त्यांना विकले होते? तुम्ही त्यावर विश्वास करता काय? [मंडळी म्हणते “आमेन.”—सम्पा.] तिने, निश्चितच, केले. मग मानलेली तत्वे काय चांगली आहेत जी बायबलवर आधारीत नाही? माझी इच्छा आहे की कोणीतरी शोधावे की प्रेषितांची तत्वे काय होती. किंवा ह्याविषयी एक शब्द तरी बायबलमध्ये आहे का ती कॅथलिक तत्वे आहेत, प्रेषितांची तत्वे नाही.

136 प्रेषितांची कृत्ये 2:38 वाचा, ती प्रेषितांची तत्वे होती, जर त्याच्याकडे ती आहेत. होय, समजले? आता कसेही करुन तेच त्यांनी सदैव अनुकरण केले...समजले?

137 म्हणून, त्यांनी त्यांचे जन्मसिध्द अधिकार विकले, केवळ तेच नाही, मेथॉडिस्ट, बॅप्टीस्ट, प्रेसबेटेरियन, पेंटेकॉस्टल्स, त्यांच्यातील इतरांनी त्याच गोष्टी केल्या. तिने

संप्रदाय उभारले. ते रोम होते, ज्याने तिला तसे करण्यास भाग पाडले, तिने संप्रदाय उभारले आणि एका मनुष्यास त्यांच्यावर प्रमुख केले. आणि मेथॉडिस्ट, बॅप्टीस्ट, पेंटेकॉस्टल्स आणि प्रत्येक जणांनी तिच गोष्ट केली, मनुष्यांच्या समुहाला त्यांच्यावर बसवले. परमेश्वर काही का सांगेना...तुम्हाला तेच करावे लागेल. ज्याप्रकारे त्यांनी करण्यास सांगितले आहे.

138 ठीक, हे काय आहे? हे जगात काहीच नाही परंतु आध्यात्मिक जारकर्म आहे, ही एक वाईट प्रकारची स्त्री आहे. होय, महाशय. जे मानवी तत्वे, मनुष्यांनी बनविलेल्या मतांना प्राधान्य देतात. ती देवासमोर कलावंतीण आहे. तुम्ही विश्वास करता की बायबल असेच सांगते? तिच्या मुलींनीही तसेच केले आहे.

139 जर तुमची ते अधोरेखीत करण्याची इच्छा असली तर प्रकटीकरण 17मध्ये पाहा. योहान आत्म्यात वर घेतला गेला, "आणि बसलेल्या एका मोठ्या कलावंतीणीला पाहीले..." आणि आपण ते मागील रात्री वाचले. आणि तेथे सात डोंगर होते. आणि तिने नक्की तेथे काय केले आणि तिने जगाला तिचे घाणेरडे जारकर्म दिले. हे बरोबर आहे? "आणि पृथ्वीवरील सर्व राजांनी तिच्याबरोबर जारकर्म केले," फसवणे, आणि चोरी, आणि खोटे, आणि—आणि पश्चातापासाठी पैसे देणे, आणि नोवेना आणि इतर सर्व गोष्टी.

140 ठीक आहे, आता लक्षात ठेवा, तीला मुली आहेत, ठीक आहे, जर ती एका संघटनेंच्या प्रणालींची भाग बनते. तर संपूर्ण प्रणाली चुकीची आहे. आणि जर हव्वा, परमेश्वराची आज्ञा मोडते, सर्व गोष्टींना मृत्युत नेते, ज्या तिच्या अधिन होत्या, आणि अधीन प्रत्येक मंडळी जी संस्थागत झाली आहे. जी तिच्या अधीन आहे. सर्वांना मृत्युत नेते. ते अगदी बरोबर आहे. सर्व गोष्टी मृत्युत गेल्या आहेत. हे तंतोतंतपणे वचनानुसार आहेत. प्रकटीकरण 17वाचा. आणि बायबल सांगते की तो "तिला आणि तिच्याबरोबर लेकरांना अग्नीने जाळील." ते बरोबर आहे. त्याचा अर्थ प्रत्येक संस्थागत प्रणाली कलावंतीणीसह जळेल.

141 आता, ही गोष्ट खूप साधी वाटत आहे, आणि मला—मला माहीत आहे की तुम्ही ह्यातून ती ऐकाल, आणि माझी इच्छा आहे की तुम्ही ह्यामधून ऐका.:आणि मी—मी... तरीही ते सत्य आहे. बायबल तसे सांगते, म्हणून ते सत्य आहे.

142 ती एक "कलावंतीण" झाली. तुम्ही हे प्रकटीकरण 17व्या अध्यायात वाचू शकता. तिने, तिने काय केले. तीने आपल्या पतीच्या विरुध्द जारकर्म केले. तुम्ही म्हणाल "ठीक आहे," तसे नाही. "तसे बायबल सांगते." वचन परमेश्वर आहे. आणि जर तुम्ही एक गोष्ट घेतली...

143 तुमच्या पत्नीने कोणी दुसऱ्या पुरुषाला चुंबन द्यावे असे तुम्हाला वाटेल का? आणि जर ती ह्याहून अधिक काही करत नाही, तुम्हाला तीने तसे करावे असे वाटणार नाही, तिला तिचे खोटे वागणे सिध्द करावे लागेल.

144 "जो कोणी ह्यातून एक शब्द काढील, किंवा एक ह्यांत भर घालील." हालेलुयाह! ख्रिस्ताला त्याची पत्नी वचनाप्रमाणे शुध्द पाहीजे. [भाऊ ब्रॅन्हम मंच चार वेळा वाजवतात—सम्पा.] त्याचप्रमाणे ती असली पाहीजे.

145 कारण, काहीच नाही, एक बिंदू, किंवा एक काना, किंवा काही गोष्टी, किंवा शीर्षक नियमशास्त्रांतून किंवा त्या पुस्तकातून पूर्ण होईपर्यंत काढले जाणार नाही. येशू म्हणाला, "आकाश आणि पृथ्वी नाहीतशी होतील, परंतु माझी वचने नाहीतशी होणार नाही."

146 त्यास तुम्ही वैयक्तिक अनुवाद लावू नका. त्याला एक शुध्द, भेसळ विरहीत हवा. प्रेम करण्याचे चाळे करणारी पत्नी नको. मला माझी पत्नी इतर पुरुषाबरोबर प्रेमाचे चाळे करणारी आवडणार नाही. आणि जेव्हा तुम्ही कुठल्याही प्रकारचे तर्क ऐकता त्या पलीकडे तुम्ही ऐकता तर तुम्ही सैतानाशी प्रेमाचे चाळे करता. आमेन! तुम्हाला हे धार्मिक बनवत नाही काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] परमेश्वराची इच्छा आहे की तुम्ही व्यभिचाररहीत असावे. सदैव वचनाबरोबर रहावे. सदैव त्याबरोबर राहा. ठीक आहे.

147 परमेश्वराने तिला अभिवचन दिले आहे, जसे त्याने हव्वेला एदेन बागेत दिले होते, येथे ह्या अंतिम हव्वेलाही दिले आहे. पेंटेकॉस्टल मंडळी, जी मंडळीची सुरुवात आहे, आणि ही मंडळी जी सर्व जीवंत लोकांची माता आहे, कारण, जोपर्यंत ते तेथे जातात. परंतु, तुम्ही पाहता, जेव्हा ते तीची पापे घेतात, ते तिच्याबरोबर मृत होतात.

148 येथे एक लहानसा व्यक्ति येतो. तो म्हणतो, "मला—मला परमेश्वराची सेवा करायची आहे."

149 ते म्हणतात, "ठीक आहे, तुला हे करायचे आहे की तू तेथे खाली जा आणि पश्चाताप कर!"

"ठीक आहे, मी ते करीन. परमेश्वराला गौरव असो!" तेथे खाली जा, पश्चाताप कर.

150 "आता आमच्यात सहभागी हो." तुम्ही तेथे आहात. होय, समजले? ते तसेच करतात. होय! ते खरे आहे, तेथेच ते मृत होतात. पाहिले? समजले? हेच...हेच हे पुस्तक शिकवत आहे, पाहा, हे मी सांगत नाही. कारण, हे येथे असे सांगते. ठीक आहे.

151 आता, परमेश्वराने जसे हव्वेला, तसेच तिला अभिवचन दिले. त्याने हव्वेला सांगितले तेथे एक असा समय येईल की वचन पुन्हा तिच्याकडे परत येईल. आता तुम्हाला ते लक्षात आहे काय? तिने काय गमावले, ते तिला पुन्हा दिले जाईल. कारण, तेथे एकच गोष्ट आहे, जी परत केली जाईल आणि ते वचन आहे. अगदी बरोबर आहे.

152 मी म्हणालो, बंदूक चालव, आणि तुम्ही लक्ष्यावर मारीत नाही, तर तुम्ही पाहा की ती गोळी कोठे गेली आहे. तुम्हाला परत यावे लागेल आणि पुन्हा सुरुवात करावी लागेल. समजले?

153 आणि जर तुम्ही परत येऊ इच्छिता, तर तुम्ही नाईसिया सभेकडे जा. तेथूनच तुम्हाला परत सुरुवात केली पाहीजे. त्या संघटनांपासून, तशा सर्व मंडळ्यांपासून मागे जा. आपण हे शिक्के अगदी पूर्णपणे पाहात आहोत.

154 मी माझ्या सर्व आयुष्यात सदैव आश्चर्य करतो. मी इतका संस्थात्मक प्रणालीच्या विरुध्द का आहे. लोकांविरुद्ध नाही, नाही. लोक माझ्या किंवा तुमच्यासारखे किंवा इतर कोणासारखे आहेत. परंतु ती प्रणाली, ती संप्रदायाची प्रणाली, आता मी येथे ह्या समयी पाहात आहे. मी आता पर्यंत त्याविषयी काहीच जाणत नव्हतो. आणि हे खरे आहे.

155 परमेश्वराने आध्यात्मिक हव्वेला अभिवचन दिले, जसे त्याने स्वाभाविक हव्वेला दिले होते, की पुन्हा वचन तिला दिले जाईल. अंतिम समयात तो मंडळीला पुन्हा मुळ वचनाकडे उभारिल.

156 आता अधिक जवळून पाहा. मी—मी आता तुम्हाला निश्चित पाहू इच्छितो. परमेश्वराने हव्वेला अभिवचन दिले होते. एक समय येईल जेव्हा वचन तिच्या बीजाद्वारे परत आणले जाईल. हे वचनच स्वतः, बीज बनेल. आणि जेव्हा त्यांनी तीला पर्याय दिला, तिने तो पर्याय पकडून ठेवला. आणि जेव्हा वचन तिच्याकडे आले, तिने काय केले. "मला ते नकोय." ते खूप नम्र होते. तिला ते योग्य वाटले नाही. ते पुरेसे चांगले

वाटले नाही. "एक तबेला? ओह, माझ्या देवा! बापरे! असा एक मनुष्य, जो एक दिवसही शाळेत गेला नाही? मी जो स्विकारु शकत नाही. तो मसीही नाही. एक मनुष्य ज्यास लोकं चारही बाजूंनी अशा प्रकारे लाथ मारतात, आणि मग त्याला 'मसीहा' म्हणतात? त्यांना त्याच्या चेहऱ्याभोवती कपडा लपेटू द्या, मग त्याच्या डोक्यावर प्रहार करु द्या. आणि तो स्वतःला संदेष्टा म्हणतो, एक खरा संदेष्टा, जो उभा राहीला आहे?"

157 वास्तवात, त्यांनी संदेष्ट्यांना ओळखले नव्हते. येशू तसे म्हणाला. तो म्हणाला, "जर तुम्ही संदेष्ट्यांना ओळखले असते, तर तुम्ही मलाही ओळखले असते." ते बरोबर आहे.

158 आता लक्ष द्या. परंतु जेव्हा वचन तिच्याकडे आले, त्याचप्रकारे ज्याप्रकारे परमेश्वराने म्हटले होते की ते येईल. तिने त्याची रुपरेषा वेगळ्याप्रकारेच केली. मी वधुविषयी बोलत आहे. यहुदी वधू, हिब्रु वधू. ती सुरुवातीपासून हव्वा होती. तर जेव्हा ते येथे आले, तिला ते स्विकारायचे नव्हते. तिला तिच्या पर्यायाबरोबरच राहायचे होते.

159 आता, परमेश्वराने आध्यात्मिक हव्वेला, पेंटेकॉस्टच्यावेळी, ते घडण्याअगोदरच सांगितले, मंडळीचे पतन होण्याच्या चारशे वर्षांपूर्वी सांगितले की त्यांचे पतन होईल. आणि ते तेच करतील जे त्यांनी केले. परंतु, त्याने अभिवचन दिले, अंतिम दिवसात तो वचन पुन्हा पाठवील.

160 येशूने ह्याच गोष्टी सांगितल्या जेव्हा तो पृथ्वीवर होता, तो पुन्हा वचन पाठवील आणि...त्याला काय मिळेल? त्याला त्याच गोष्टी पाहायला मिळतील. ज्या त्याला मिळाल्या होत्या. जेव्हा तो पहिल्यांदा आला, बरोबर आहे. त्यांना त्यांचे पर्याय पाहीजे. त्यांना त्यांचे संप्रदाय पाहीजेत. त्यांना त्याची मानवी तत्त्वे पाहीजेत. त्यांना जसे वाटते तसे जगाचये आहे. आणि त्यांना हे म्हणायचे आहे की, "अच्छा मी *अमुक–अमुक* आहे, मी *अमुक–अमुकचा* सदस्य आहे." त्यांना ह्याने काही फरक पडत नाही, की देव काय करीत आहे. त्याने त्याला किती प्रकट केले आहे; तो मृतांना उठवू शकतो; तो हृदयांतील रहस्ये सांगू शकतो; तो त्या सर्वगोष्टी करू शकतो ज्या बायबल सांगत आहे की तो करील. त्याने त्यांना किंचितही फरक पडत नाही. "जर ते माझ्या संघटनेशी संबंधीत नाही, तर मला त्याच्याशी काही एक कर्तव्य नाही." समजले?

161 तीच गोष्ट जी इब्री वधूने केली, ते बरोबर आहे, पाहीले, त्यांनी त्यांच्या पर्यायाचे ऐकले आणि परमेश्वराने त्यांना सत्याविषयी अभिवचन दिले होते. आणि जेव्हा सत्य आले, त्यांनी ते नाकारले. तो खूप दीन होता.

162 आता आजही तीच गोष्ट आहे. जेव्हा ह्या गोष्टी दृश्यात घडत आहे. आता, परमेश्वर मलाखी 4मध्ये म्हणाला, की तो अंतिम समयात संदेश पाठविल. तो मुळ स्थितीकडे नेईल. योएल म्हणाला, "मी त्या सर्व वर्षांची भरपाई करुन देईन." सर्व गोष्टी ज्या रोमने मेथॉडिस्टने आणि बॅप्टीस्ट लोकांनी त्या मुळ पेंटेकॉस्टच्या शाखांतून खाऊन टाकल्या. परमेश्वराने म्हटले, "अंतिम दिवसात मी पुन्हा मुळ स्थितीकडे परत आणीन." ते खरे आहे.

163 आणि तो आपल्याकडे असा एक मनुष्य पाठवू शकतो. जो...एकच गोष्ट ही आहे की परमेश्वर आजपर्यंत त्याचे वचन त्याच्या संदेष्ट्याकडेच पाठवतो. कोणा सुधारकाकडे नाही. परंतु संदेष्ट्याकडेच पाठवतो. हा समय त्या करिता नाही. आता हा समय त्याच्या येण्याचा आहे, आणि हेच कारण आहे की आपण त्याच्या येण्याकडे लक्ष लावले आहे. तो अगदी नम्र आणि सौम्य असेल! आणि म्हणून...बापरे!

164 तुम्ही त्या खानदानी मेथॉडीस्ट, बेप्टीस्ट, आणि प्रेसबेटेरियन, पेंटेकॉस्टल, विचार करा, की ते हे कधी स्विकारतील का?

"ओह," तुम्ही म्हणा, "पेंटेकॉस्टल"?

165 पेंटेकॉस्टल हे लावदिकीयाचे आहेत. "श्रीमंत, आणि त्यांना कसली गरज नाही."

166 ते म्हणते, "तू दरिद्री आहे, हे तुला कळत नाही." कदाचित लाखो डॉलर्सच्या इमारती बांधत असशील, परंतु तू अजूनही दरिद्री, आध्यात्मिक दरिद्री आहेस.

"ओह", तू म्हणतेस, "मला हे सर्व दिसते."

"तू आंधळा आहेस!"

"अच्छा" तू म्हणतोस, "परमेश्वराचा धन्यवाद असो, मी झाकलेला आहे."

"तू उघडावाघडा आहेस!"

"ठीक आहे. मला माझ्या युवकांवर भरवसा आहे. आमच्याकडे सेमिनरी आहेत. आम्ही..."

167 "आणि तुला ते माहीत नाही." आता हे अगदी त्या विरुध्द आहे. आता, जर बायबल म्हणते, की लावदिकीया मंडळी अशा अवस्थेत असेल...

168 आणि तेथे पृथ्वीवर असा एकही व्यक्ति नाही. जो हे नाकारील की हे अंतिम युग नाही, कारण हे लावदिकीया युग आहे किंवा सातवे मंडळीचे युग आहे. आणि आपण ह्या काळात आहोत. दुसरी दोन हजार वर्षे पूर्ण होत आहेत. तेथे दुसरी मंडळीची युगे नसणार. हेच कारण आहे की तुम्ही लेटर डेज बंधुजन दुसरी संघटना सुरु करु शकत नाही. आता ह्यानंतर दुसरे मंडळीचे युग नसणार. ते बरोबर आहे. हा अंतिम समय आहे. आमेन. आणखी मंडळीची युगे नसणार. ते सर्व समाप्त झाले आहे.

169 परंतु मग जर पेंटेकॉस्टचा संदेश हा शेवटचा संदेश होता...जो न्यायीकरण, पवित्रीकरण, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, हे शेवटचे तीन संदेश, शेवटचे तीन मंडळीची युगे पूर्ण जन्माची रचना करतात.

170 ज्याप्रमाणे जेव्हा एक स्त्री तिच्या लहान बालकाला जन्म देणार असते; तर प्रथम जी गोष्ट घडते ते पाणी, नंतरची गोष्ट रक्त आहे, नंतर जीवन येते.

171 जेव्हा त्यांनी येशूला वधस्तंभावर मारले, एक वस्तू त्याच्या शरीरातून आली, की नविन बनवावे...एक जन्म व्हावा. त्यांनी त्याच्या कुशीत मारले, रक्त आणि पाणी बाहेर आले, आणि "तुझ्या हातात मी माझा आत्मा समर्पित करतो." त्याच्या शरीरातून आले होते ते पाणी, रक्त, आत्मा.

172 आता, पहिले योहानाचे पत्र 5:7 हे तुम्हाला त्याविषयी सांगते, "स्वर्गात तिघे आहेत जे साक्ष देतात. पिता, वचन (जो ख्रिस्त आहे.) आणि पवित्र आत्मा." आणि ह्या तिघांची साक्ष एकच आहे; ते एक नाहीत, परंतु ते एकाच गोष्टीत सहमत होतात. आणि तेथे तीन आहेत जे साक्ष देतात...किंवा "ते एकच आहे." मला म्हणायचे आहे. मी तेथे चूक केली आहे. "आणि ते तिघे आहेत. जे पृथ्वीवर साक्ष देतात. ते पाणी, रक्त आणि आत्मा, आणि त्या तिघांची साक्ष एकच आहे."

173 न्यायीकरणाशिवाय तुमचे पवित्रीकरण होऊ शकते. आणि तुमचे न्यायीकरण पवित्रीकरणाशिवाय होऊ शकते. तुमचे पवित्रीकरण पवित्र आत्मा मिळाल्याशिवाय होऊ शकते. ते अगदी बरोबर आहे.

174 योहान 17:17 मध्ये शिष्यांना पवित्र केले गेले होते आणि त्यांना भूते घालविण्याचा अधिकार देण्यात आला होता, परंतु त्यांच्याकडे अजूनही पवित्र आत्मा नव्हता. समजले? निश्चित त्यांना पेंटेकॉस्टपर्यंत जाणे होते आणि पवित्र आत्मा येईपर्यंत वाट पाहायची होती.

175 तेथेच यहुदाने त्याचे रंग दाखविले. पाहिले की कशाप्रकारे त्या आत्म्याने न्यायीकरण, पवित्रीकरणाद्वारे कार्य केले? परंतु जेव्हा ते शेवटाकडे आले. त्याने त्याचे रंग दाखविले. समजले? हे खरे आहे.

176 आता लक्ष द्या, आता, आणि येथे आपण अंतिम समयात आहोत. आणि आत्मिक हव्वा...ज्याप्रमाणे इब्री हव्वेला अभिवचन देण्यात आले होते, इब्री वधूला वचन परत येण्याचे अभिवचन दिले होते. आणि आत्मिक वधूला पेंटेकॉस्टपासून, जेव्हा नाईसिया येथे तीचे पतन झाले, तेव्हा तिला अभिवचन देण्यात आले की अंतिम दिवसात वचन पुन्हा येईल. आता तुम्ही म्हणता, मग...

177 जर तुम्हाला आणखी एक शास्त्रलेख पाहीजे, येथे प्रकटीकरण 10 काढा. आणि म्हटले आहे, “अंतिम दूताच्या समयात, सातवा देवदूत (सातवा संदेशवाहक) कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल, देवाची गूजे पूर्ण होतील.” समजले? मुळ स्थिती पुन्हा वचनाकडे येईल! बायबल सांगते की हा अंतिम समयाचा संदेशवाहक, “त्यांना मुळ विश्वासाकडे पुन्हा वळवील, वडिलांच्या विश्वासाकडे पुन्हा आणील.” परंतु तुम्ही विचार करता की ते ह्याचा स्विकार करतील? नाही, महाशय, “अंतिम दिवसात, तो मुळ वचनाला पुन्हा परत आणील.” ज्याप्रमाणे त्याने मलाखी4 मध्ये म्हटले आहे.

178 परंतु तीने ते गमावले होते. आता, तिने ते वचन नाईसिया येथे नाकारले. हव्वेने ते एदेनमध्ये गमावले; हव्वेने तिला कलवरीवर नाकारले. आणि नाईसिया समुह ते अंतिम दिवसात नाकारीत आहे, ते अगदी तसेच आहे.

179 परंतु जेव्हा वचन देहधारी झाले, तिने, हव्वेने, इब्री मंडळीने, सर्व आत्मिक जीवीतांच्या माताने, तेव्हा ते तिने नाकारले. ती तिच्या परंपरा आणि विशिष्ट शिकवणीत, इतकी निर्जीव झाली होती, की तिने वचन ओळखले नाही. हे ही अगदी, असेच आहे. ठीक आहे.

180 त्यांनी त्याला ओळखले नाही, जीवंत वचन, अभिवचन दिलेल्या वचनाद्वारे, देहात प्रकट झाले. वचनाने ह्या गोष्टी करण्याचे अभिवचन दिले होते, अभिवचन दिले होते की अंतिम दिवसात अशा प्रकारे होईल. “जसे सदोमाच्या दिवसात होते, तसेच मनुष्याच्या पुत्राच्या आगमन समयी होईल.” आता लक्ष द्या की, सदोमात काय घडले “जसे नोहाच्या दिवसात होते. तसेच मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्यावेळी होईल.” समजले? तेव्हा काय घडले ह्याकडे लक्ष द्या. समजले? आता, तो म्हणाला की आताही तसेच घडेल आणि आपण त्या दिवसात राहत आहोत. ठीक आहे, आणि मला वाटते. मला वचनामध्ये, असे सहाशे संदर्भ मिळू शकतील, ज्यांचा मी संदर्भ देत आहे. समजले? परंतु ते त्यास नाकारतात.

181 तिने परंपरा आणि पर्याय पकडून धरले आहेत, ह्या ऐवजी की...तिने खऱ्या रक्ताऐवजी, पर्यायी रक्ताला धरुन ठेवले आहे. येशूने जे वचन म्हटले. जेव्हा ते तिला प्रकट करण्यात आले होते, “कारण तिने ह्या रितीरिवाजांना पकडले होते...” येशू प्रकट झालेले वचन वधूला, इब्री वधूला म्हणला, “कारण तुम्ही तुमचे रितीरिवाज घेतल्यामुळे, तुम्ही देवाचे वचन तुमच्यासाठी व्यर्थ ठरविले आहे. ते परिणामकारण होऊ शकत नाही.”

182 आता, आज हेच कारण आहे की, संजीवन जे आपल्यात असायला हवे होते. ते नाही आहे, आपल्यामध्ये केवळ संप्रदायातील संजीवन आहे. आपल्याकडे ती खरी जागृती

नाही. नाही, महाशय. समजू नका की, आपल्याकडे संजीवन आहे. आपल्याकडे ते नाही, ओह, त्यांच्याकडे ते लाखो आणि लाखो आणि लाखो मंडळीत सदस्य आहेत. परंतु कोठेही संजीवन नाही. नाही.

183 वधूमध्ये अजूनही संजीवन नाही. समजले? तेथे अजूनही संजीवन नाही. देवाचे प्रकटीकरण वधूला हलवण्यासाठी अजूनही नाही. समजले? आपण आता त्याची वाट पाहत आहोत. तिला पुन्हा जागे करण्यासाठी जशा सात अज्ञात मेघगर्जना लागतील, समजले. होय. तो त्या पाठवील. त्याने तसे अभिवचन दिले आहे. आता लक्ष द्या.

184 आता ती—ती मृत होती. आणि आता जर मंडळ्या त्यांची मानवी तत्वे विसरतील, आणि त्यांच्या विशिष्ट शिकवणी विसरतील, आणि फक्त बायबल घेतील. अभिवचनाचा आश्रय घेतील, तेव्हा वचन त्यांच्यासाठी खूप प्रभावशाली होईल. परंतु, पाहा, येशूने म्हटले, "तुम्ही, तुमच्या रिती–रिवाजांद्वारे, परमेश्वराचे वचन तुमच्यासाठी व्यर्थ केले आहे." आता, आत्मिक हव्वेसाठी आज तीच गोष्ट आहे, पाहा, आजची आत्मिक वधू, तथाकथित, मंडळी. ती परमेश्वराचे वचन तर घेते, परंतु ती ते स्विकारीत नाही. आणि ती त्याऐवजी विशिष्ट शिकवणी स्विकारते. त्यामुळे, देवाचे वचन तिच्यासाठी प्रभावशाली ठरत नाही, समजले, कारण ती वचनासह तिची मानवी मते घालण्याचा प्रयत्न करते, आणि ते कार्य करीत नाही. आता आम्हाला कशाची गरज आहे...

185 मी येथे केवळ त्याच्या ठळक ओळी वाचत राहीन, *हेरॉल्ड ऑफ हिज कमींग* "आम्हाला परत जाण्यासाठी एका संदेष्ट्याची आवश्यकता आहे! आम्हाला परतण्यासाठी एका संदेष्ट्याची आवश्यकता आहे!" आणि मला वाटते, जेव्हा तो येईल. त्यांना त्याविषयी काहीच कळणार नाही...ते बरोबर आहे. हे नेहमी असेच झाले आहे. तुम्हाला समजले. "आम्हाला त्याची गरज आहे." तुम्ही सर्व ह्याविषयीच बोलता, "आम्हाला परतण्यासाठी एका संदेष्ट्याची आवश्यकता आहे. जो प्रभूचे वचन निर्भिडपणे, आणिल. आपण विश्वास करतो की बायबलने त्याचे अभिवचन दिले आहे."

186 आता, मी भाऊ—भाऊ मूरे आणि त्यांना ओळखतो, जे सम्पादक आहेत, त्यांच्याबरोबर त्याच्या घरात भोजन केले आहे, आणि इतर सर्व गोष्टी केल्या आहे. आणि तो एक अतिशय चांगला व्यक्ति आहे. जो—जो चामडी बुटात चालतो, मला वाटते तो उत्तम प्रतीच्या रुबाबदार लोकांमधील एक आहे. परंतु पाहा, त्याला माहीत आहे की, आपल्याकडे ते असले पाहीजे. आणि बहिण मुरे, (एक उत्तम दर्जाची बाई) स्त्री आहे... ती लीन आहे, आणि ते त्याग करतात.

187 आणि माझ्या मते *द हेराल्ड ऑफ हिज कमींग*. हा ह्या क्षेत्रात सर्वात चांगले वर्तमानपत्र आहे. परंतु तुम्हाला कळेल, ते नेहमी धमाका चालू ठेवतात की, "आम्हाला एका संदेष्ट्याची आवश्यकता आहे! आम्हाला एका संदेष्ट्याची आवश्यकता आहे!" समजले? हेच आहे ज्याविषयी ते बोलत असतात.

188 आणि आज, आपण पुन्हा येथे आहोत, आणि काल आणि आजप्रमाणे, रेडिओवर घोषणा होत आहे की...बॅप्टीस्ट मंडळ्या आणि इतर सांगतात की "आम्ही कॅथलिकांमध्ये मिसळणार नाही, परंतु आम्हाला त्यांच्याशी एक प्रकारे सहभागिता करायची आहे." समजले?

189 आणि येशूनच संदेश येथे येत आहे. "त्या विषारी वस्तूपासून दूर राहा." पाहिले? समजले? "पूर्वसंकेत केल्याशिवाय दोघेजण एकमेकांबरोबर चालतील काय?" प्रकाश आणि अंधार एकत्र सहभागिता करु शकत नाही. जेव्हा प्रकाश आत येतो, अंधार निघून जातो. समजले?...सर्वात सामर्थ्यशाली! तुम्ही अंधाराद्वारे उजेडाला बाहेर काढू शकत

नाही. परंतु तुम्ही उजेडाद्वारे, अंधार बाहेर काढू शकता. हे बरोबर आहे. आणि तो प्रकाश आहे, आणि तो वचन आहे. समजले? आता, तुम्ही ठीक तेथे आहात, जेथे तुम्हाला असले पाहीजे. तुम्ही हे खोटे ठरवू शकत नाही किंवा काही चुकीचे करु शकत नाही. होय, महाशय, हे ठीक पुन्हा त्याच स्थळी परत येते.

190 जसे एखादा व्यक्ति तुमच्याशी वादविवाद करण्याचा प्रयत्न करतो, तर तुम्ही हे जाणाल की तो काय विश्वास करीत आहे.

191 हे असेच आहे, जसे तुम्ही एक ससा घेता आणि त्याला पिंजऱ्यामध्ये सोडता आणि तुम्ही पिंजऱ्याचा प्रत्येक छिद्र बंद करता. तुम्ही फक्त पिंजऱ्याच्या दाराशी उभे राहा. तो परत येईलच. तेथे हेच घडणार आहे. समजले? त्याला परत दरवाजापाशी यावेच लागेल, कारण तोच एक मार्ग आहे जेथून तो बाहेर जाऊ शकतो. तो दरवाजावर *त्याचे* डोके घासेल, आणि जवळजवळ त्याची मान मोडेल, आणि *तेथे* पुन्हा जाईल. फक्त उभे राहा. आणि त्याला पाहत राहा. आणि तो तेथेच परत येईल. समजले? बस हेच तो करील.

192 ते करण्याचा तोच एक मार्ग आहे. त्या वचनाबरोबर राहा. तुम्ही मानवी मतांनी, चारही बाजूला धमाका करु शकता. तसे करुन तुम्ही तुमच्या मानेला सर्व बाजूने तोडाल, परंतु तुम्हाला ह्या वचनाकडेच परत यावे लागेल. समजले? होय, महाशय. हेच ते सर्व आहे.

193 आता, पाहा, त्यांना—त्यांना—त्यांना—त्यांना ते नकोय. त्यांना परमेश्वराचे वचन नकोय. कारण तिने तिचे रिती–रिवाज पकडून ठेवले आहेत, तिने परमेश्वराचे वचन प्रभावहीन करुन टाकले आहे.

194 आता, तसेच, आत्मिक हव्वेलाही लागू होते. तिला नकोय...ती तिचे रिती–रिवाज ठेवू इच्छिते. आणि परमेश्वराच्या वचनापासून दूर जाऊ इच्छिते. तिने पुन्हा संप्रदाय आणि त्यांची मानवी मते आणि वडिलांचे रिती–रिवाज, ह्यांना देवाच्या वचनाऐवजी पकडले आहे.

195 आणि अंतिम दिवसात, जेव्हा परमेश्वराचे वचन तिच्याकडे आणले आहे, ती त्याचा स्विकार करणार नाही. कारण ती आपल्या रित–रिवाजांशी अशाप्रकारे जडली आहे. जसे इब्री वधू जडली होती. जसे खरे वचन, प्रकट केले आहे, सिध्द केले आहे, सत्याद्वारे साबित केलेले आहे, ती त्याचा स्विकार करणार नाही. ती असे का करील? कारण तेथे तिची प्रतिक आहे. ती ते करु शकत नाही. ते बरोबर आहे. ती तिच्या प्रतिकाला खोटे ठरवू शकत नाही. समजले? आणि त्याविषयी भविष्यवाणी केली आहे की ती तसे करीलच, म्हणून तुम्ही हे घडण्यापासून कसे रोकू शकाल?

196 आता केवळ एकच गोष्ट करणे आहे. ती म्हणजे तुम्ही ज्यात आहात, त्यात प्रसन्न राहा. तेच सर्व आहे. त्यासाठी वाट पाहा. ठीक आहे.

197 परमेश्वराने अभिवचन दिले आहे, की अंतिम दिवसात तो त्याचे वचन तिला प्रकट करील आणि सत्याने साबित करील, आणि तोपर्यंत ती ते करणार नाही. हे सर्व परमेश्वराने तिला त्याचे दास, संदेष्टे ह्यांद्वारे अभिवचन दिले आहे. परमेश्वराने येशू ख्रिस्ताद्वारे, अभिवचन दिले आहे. परमेश्वराने, योएल संदेष्ट्याद्वारे अभिवचन दिले आहे. परमेश्वराने, पौलाद्वारे अभिवचन दिले आहे. परमेश्वराने मलाखी योहानाद्वारे अभिवचन दिले आहे...परमेश्वराने प्रकटीकरण प्राप्त झालेल्या योहानाद्वारे, सर्व संदेष्ट्याद्वारे अभिवचन दिले आहे, की शेवटचा संदेश तिच्यासाठी काय असेल. आता, जर तुम्ही त्यांना लिहून घेऊ इच्छिता. अर्थात, तुम्हास सर्वांना ते माहीत आहेत. येशू, योहान 14:12, आणि योएल, 2:38, पौल, दुसरे तिमथ्य 3रा अध्याय, मलाखी 4था अध्याय, आणि योहान प्रकटीकरण देणारा प्रकटीकरण 11, सतरा, एक ते सतरा. पाहा, आता काय

घडणार आहे ते! आणि मंडळीसाठी ते काय आहे? मुर्तिमान वचन त्याच्या लोकांमध्ये पुन्हा देहधारी झाले! समजले? आणि त्यांनी त्यावर विश्वास ठेवला नाही.

198 तुम्हाला माहीत आहे येशूने काय म्हटले जेव्हा त्याने ते पाहीले...जेव्हा त्याने त्यांच्यासमोर चमत्कार केले, आणि सिध्द केले की तो देव होता? जे काही तो करीत होता, ते सिध्द केले. तो कोण होता. त्याने अगदी तेच केले. त्याने—त्याने त्यांना म्हटले, तो म्हणाला, "हे कफर्णहूमा, तू आकाशापर्यंत चढविले जाशील काय, कारण...तुझ्यामध्ये जी पराक्रमाची कृत्ये घडली ती सदोमात घडली असती, तर ते आजपर्यंत राहीले असते." आणि कफर्णहूमात, त्याने कधीच काही केले नाही, परंतु काही लोकांना बरे केले, आणि त्यांना त्यांच्या हृदयांतील रहस्ये सांगितली, आणि तेथून निघून गेला. होय. हेच सर्व आहे. समजले?

199 त्यांना माहीत नव्हते की पराक्रमाची कृत्ये काय आहेत. त्यांना वाटले तो एक मोठा समारंभ असणार जेथे सर्वजण उभे राहणार, आणि न्यायाधिश भाषण करणार, आणि—आणि बँड वाजणार, आणि रंगीत झेंडे फिरवले जाणार आणि चांगले पोषाख परिधाण केलेल्या स्त्रीया, आणि त्यांचे...आणि विलंब केला जाणार आणि सर्व पी. एच. डी. एल. एल. डी. आणि मोठ्या आणि उंच टोप्या घालणारे आणि आपल्या गोल कॉलर करुन आणि सर्व गोष्टी, ते सर्वांना आत यावे लागेल. "हा कुठला मोठा समारंभ आहे."

परमेश्वर म्हणतो, "ही मुर्खता आहे."

200 आणि परमेश्वर एक अशा साधारण व्यक्तिला उभा करु शकतो, ज्यास कदाचित, मुश्किलीने अ ब क मधील भेद ही करता येतो, आणि तो असे काही करतो की खऱ्या मंडळीत जागृती उत्पन्न करतो. आणि इतर लोक अशा मंडळीला "देववेडे लोक म्हणतात." परमेश्वर *त्यांना* "महान", म्हणतो, आणि जग त्यांना "मुर्ख" म्हणते. जग *ज्यास* "महान" म्हणते आणि परमेश्वर त्यांना "मुर्ख" म्हणतो. पाहीले, अगदी विरुध्द आहे. समजले? आणि ज्या गोष्टीचे परमेश्वराने अभिवचन दिले आहे, परमेश्वर ते करील आणि परमेश्वराने ते केले आहे. समजले? आपण येथे आहोत.

201 आता, पाहा, तिने आताही तेच केले, जे इब्री हव्वेने केले. ती खऱ्या वचनाचा स्विकार करणार नाही. तुम्ही मेलेल्यांना जीवंत करु शकता. तुम्ही परमेश्वराचा आत्मा पाहू शकता. येशू खाली आला, त्याला त्याने देवाचा पुत्र म्हणून प्रकट केले. प्रथम त्याने प्रचार करण्यास सुरुवात केली. अच्छा, त्यांनी विचार केला, "अच्छा, हा एक विचित्र प्रकारचा व्यक्ति आहे. हा कोण आहे?" अच्छा, प्रथम गोष्ट तुम्हाला माहीत आहे का, लोक म्हणायला लागले...

202 जेव्हा त्याच्या अगोदर त्याचा अग्रदूत योहान आला, तेव्हा वास्तवात, त्यांनी त्यास हेच विचारले होते की, "तू मसीहा आहेस का?"

203 तो म्हणाला, "नाही. परंतु तो तुमच्यामध्ये इथेच कुठेतरी उभा आहे." होय, समजले? का? त्याला माहीत होते, की जेव्हा त्याचा संदेश दिला जाईल. तेव्हा त्याला काय करायचे आहे. त्याला माहीत होते की तो काय करणार होता.

204 ज्याप्रमाणे नोहा हनोकावर दृष्टी लावून होता. जेव्हा हनोक गेला. नोहा म्हणाला, "उचित हेच असेल की, तारुच्या जवळ जावे. समय अधिक जवळ आहे." नोहा हनोकावर दृष्टी लावून होता. समजले?

205 आणि योहान त्या चिन्हाकडे पाहत होता, जे येशूने त्याला सांगितले होते, किंवा परमेश्वराने त्याला पाहण्यासाठी सांगितले होते. तो म्हणाला, "तो येथे आता तुमच्यामध्ये कुठेतरी उभा आहे. मी त्याला ओळखत नाही, परंतु मी त्याला ओळखेन."

206 जेव्हा तो तेथे उभा होता, तेव्हा त्यांनी त्याला विचारले होते. “तू मसीहा आहेस का?” म्हणाले, “आम्हाला मुख्य कार्यालयातून पाठवण्यात आले होते.” होय, “आम्ही वडिलांना आणि इतर महान व्यक्तिंना येथे खाली पाठविण्यात आले आहे. जर तू मसीहा असलास, तू का वर येत नाहीस आणि तेथे स्वतःला प्रकट कर, येथे खाली ह्या नीच श्रेणीच्या लोकांच्या समुहात करु नको! तू तेथे ये आणि स्वतःला प्रकट कर.”

207 तो म्हणाला, “मी मसिहा नाही.” तो म्हणाला, “मी अरण्यात ओरडण्याची वाणी आहे.”

208 त्या गोष्टी त्यांच्या डोक्यावरुन शक्य तितक्या गेल्या. त्यांना त्याविषयी काही कळले नाही, समजले, आणि तरीही ते सर्व त्याच्या येण्याची वाट पाहत होते. “परंतु हा व्यक्ति त्याच्यासारखा नसू शकतो. ओह, माझ्या प्रभू, जर असला तर ती एक भयानक गोष्ट होईल!”

“तू कुठल्या शाळेतून शिक्षण घेतले आहेस?”

“कोणत्याही नाही.”

“तुझ्याकडे तुझ्या सहभागितेचे पत्र आहे का?”

“ते काय आहे?” समजले?

209 तो परमेश्वराचा अभिषिक्त होता. तो म्हणाला, “माझ्याकडे एकच गोष्ट आहे. कुऱ्हाड झाडाच्या मुळाशीच ठेवली आहे.” आता, हेच सर्व त्याच्याकडे—त्याच्याकडे होते. तो जंगली मनुष्याच्या भाषेत बोलला, त्याची भाषा एका धर्मशिक्षण देणाऱ्या व्यक्तिची नव्हती; सापाची पिल्ले, आणि कुऱ्हाड, आणि झाडे, आणि अशा प्रकारची. तो—तो धर्मोपदेशकाच्या भाषेत बोलला नाही.

210 परंतु येशू म्हणाला, त्याच्यासारखा संदेष्टा कधीच झाला नाही. “त्याच्या दिवसापर्यंत त्याच्यासारखा स्त्रीपासून कोणीही मनुष्य जन्मला नव्हता.” हे बरोबर आहे. “तो एका संदेष्ट्यापेक्षा अधिक होता.” तो कराराचा संदेशवाहक होता, जो दोन कालखंडाच्या मध्यभागी उभा होता. समजले? “संदेष्ट्याहून मोठा.”

211 आणि म्हणून तेव्हा—तेव्हा त्यांनी त्याला ओळखले नाही. त्यांनी त्याला समजले नाही. तो एक विचित्र प्रकारचा व्यक्ति होता, म्हणून त्याने त्याला नाकारले, समजले.

212 तेव्हा, जेव्हा येशू आला, आणि निश्चित ते त्याचा स्विकार करणार नव्हते, हा सुताराचा मुलगा, त्याच्यामध्ये असे काही नव्हते. त्याच्यामागे “अनौरस संतती” असे वाईट नाव लावले होते. आणि ते त्याच्यासारख्या व्यक्तिला पाहू शकत नव्हते.

213 परंतु, परंतु पाहा, देवाने काय केले. त्याने ते अशिक्षित, गरीब, मासेमारी करणारे, लाकूडतोडे, शेतकरी, आणि वेश्या, ह्यांना घेतले, आणि मान्यवर व्यक्तिंना तेथेच बसू दिले. का? काय? त्याने ते का केले? त्याने अशी गोष्ट का केली? तुम्ही कल्पना करु शकता का? कारण त्या लोकांनी त्याला ओळखले होते की तो वचन आहे. आता काही मिनिटासाठी ह्याचे अवलोकन करुया.

214 येथे एक म्हातारा अशिक्षित, मासे पकडणारा आहे, जो त्याचे नावही लिहू शकत नाही. बायबल म्हणते, की तो “अज्ञानी आणि अशिक्षित होता.” तो त्याचे मासे पकडत होता. आणि त्यांना एकत्र करीत असे. तो तेथे खाली जात असे. आणि पहात असे की हा सर्व गोंगाट कसला आहे. परंतु त्याच्या आतमध्ये त्याला ठाऊक होते की बायबल म्हणते की, मसीहा...सर्व इब्री मसीहाची वाट पहात आहे, कारण ते जाणत होते की जेव्हा तो येईल तेव्हा वचनानुसार घटना घडतील.

215 तेथे खूप मसीहा उठले होते, आणि म्हणत होते, “मी तो आहे.” आणि शेकडो लोक त्याच्यामागे गेले, आणि—आणि नाश पावले आणि सर्व गोष्टी. परंतु, पाहा, ते ह्यासाठी घडले की जेव्हा खरा मसीहा येईल तेव्हा त्याच्याकडून लोकांचे लक्ष फिरवले जावे.

216 आपल्याकडे एलियाचा झगा आणि अंगरखा आहे, आणि इतर सर्व गोष्टी होत्या; परंतु जेव्हा—जेव्हा—जेव्हा—जेव्हा तो आला ह्या सर्व गोष्टींनी लोकांचे लक्ष वास्तविक गोष्टीकडून फिरवले. समजले? ते बरोबर आहे. सर्व प्रकारचे लोक ज्यांनी लांब झगे आणि वस्त्रे घातली होते, आणि सर्व प्रकारच्या टोप्यांनी लपेटले होते, आणि सर्व इतर गोष्टी... ते—ते तर फक्त सिध्द करते. जसे बोगस डॉलर, दर्शवितो की तेथे कुठेतरी खरा डॉलर आहे, जर तुम्ही तो फक्त शोधू शकता. समजले?

217 तर तो येथे येतो. आता हे मान्यवर व्यक्ती बाहेर येतात, आणि ते त्यांच्या पर्यायात इतके गुंतले होते! ते म्हणतात, “आता जर मसीहा येईल, तो निश्चित कैफाकडे येईल. तो आमच्या संप्रदायाकडे येईल. तो परुश्यांकडे येईल.” सदूकी म्हणतात, “तो हाच आहे. ज्याविषयी तुम्ही विचार केला होता! तो सदुक्याकडे येईल” आणि तेव्हा लोकांचे तसे विचार होते, समजले, आजही ते तशाच गोष्टी करतात, आता.

218 परंतु जेव्हा तो आला, तेव्हा ते त्यांच्यासाठी फार चमत्कारिक होते. जेव्हा तो आला तो अगदी त्यांच्या विचारांच्या विरुध्द आला, परंतु तो वचनानुसार आला. आणि त्यांनी वचनाला ओळखले नाही.

219 मला सांगू द्या की, तुम्ही वास्तवात समजावे, हे खोलवर उतरु द्या. माझी इच्छा आहे की हे तुम्हाला समजावे. हीच गोष्ट आज तुम्हाबरोबर आहे. समजले, तुम्ही वचन समजत नाही! समजले?

220 येशूने म्हटले, “तुम्हाला आकाशातील लक्षणांचा अर्थ लावता येतो, परंतु ह्या काळाच्या लक्षणांचा अर्थ तुम्हाला लावता येत नाही.”

तुम्ही म्हणता, “आमच्याकडे मोशे आहे.”

221 म्हणून, तो म्हणाला, “जर तुम्ही मोशेला ओळखले असते, तर तुम्ही मला ओळखले असते.” त्यांनी मोशेला ओळखले नाही, आणि म्हणून त्यांनी मला ओळखले नाही. त्यांना फक्त पंथ ठाऊक आहेत. ज्यात ते जन्मलेले आहेत.

222 आता, जुन्या मासेमारी, करणाऱ्याला पाहूया. त्याने त्याची टोपली नीट केली. त्याने आपल्या पांढऱ्या दाढीवर हात फिरवला, आणि हे बोलत खाली जाऊ लागला, “माझा विश्वास आहे की मी पाहीन की हा कोण आहे.”

223 त्याचा भाऊ म्हणाला, “ये आपण तेथे खाली जाऊया.” म्हटले, “हा तोच व्यक्ति आहे. हा तोच व्यक्ति आहे, असे ते दुसऱ्या दिवशी बोलले...मी काल संपूर्ण रात्र त्याच्याबरोबर राहीलो. तुम्ही योहानास ओळखता, मी त्याच्याविषयी तुमच्याशी बोलत होतो?”

224 “होय, तेथे तो जंगली मनुष्य आहे! होय, मी त्याच्या विषयी ऐकले आहे.” असे वृध्द शिमोन, बोलला असेल. “मी तेथे खाली त्याच्या विषयी ऐकले आहे. होय, दोन किंवा तीन महिन्यांपासून, तो तेथे खाली आहे.”

225 “अच्छा, तो म्हणाला...आणि एके दिवशी तेथे तो उभा होता, त्याने एक विचित्र गोष्ट सांगितली. तो म्हणाला, ‘पाहा, येथे तो आता येत आहे!’ त्यांनी विचारले, ‘तुला हे कसे ठाऊक?’ त्याने तेथे वर पाहिले, तेथे एक साधारण व्यक्ति उभा होता. तो म्हणाला, ‘मी देवाचा आत्मा, कबुतराप्रमाणे, खाली उतरताना पाहीला. मी एक वाणी ऐकली, “तो तोच

आहे. हा माझा 'पुत्र' मला परमप्रिय आहे. ह्याच्यामध्ये राहण्यास मी संतुष्ट आहे."' नंतर तो पाण्यात चालून गेला आणि त्याला बाप्तिस्मा दिला, तेथे तो म्हणाला की तो त्याला ओळखतो."

226 "ओह, मला माहीत नाही," शिमोन म्हणाला, "मी हे सर्व खूप वेळा, ऐकले आहे." परंतु येथे तो आला आहे. परंतु त्याच्या हृदयात पूर्वनियुक्त बीज होते समजले? येशूने तसे म्हटले. हे बरोबर आहे. त्याच्याकडे चालत गेला. म्हणाला, "मी खाली सभेत जाईन आणि पाहीन." तो तेथे गेला.

227 येशू तेथे, एक साधारण व्यक्तिसारखा उभा होता. वर चालत गेला. तो म्हणाला, "तुझे नाव शिमोन आहे. आणि तुझ्या पित्याचे नाव योना आहे." त्यामुळे तो आश्चर्यचकित झाला. का? कारण ते लहानसे, सार्वकालिक जीवनाचे बीज तेथे पडले होते. होय, महाशय.

228 तो म्हणाला, "एक मिनिट थांब! ते कसे काय? तू मला कधीच पाहीले नाही. तु माझ्या वडिलांना ही ओळखत नाहीस, कारण ते कित्येक वर्षापासून मृत आहेत. परंतु तू येथे आलास, मला ते कसे सांगितले? आता, मला माहीत आहे की बायबल म्हणते..." आता, त्याने असे सांगितले नाही की वडिल काय म्हणतात त्याकडे जा. "परंतु बायबल म्हणते की मसीहा एक संदेष्टा असेल. तेथे तोच आहे. तोच तो आहे."

229 एके दिवशी येशू यहुद्यांच्या समुहाबरोबर, शोमरोनामधून जात होता. त्याने त्यांना सोडले. आणि ही लहानशी बदफैली स्त्री, तेथे आली, तुम्हाला माहीत आहे, कदाचित ती एक सुंदर युवती असेल. आणि तिला एका बालकाप्रमाणे, रस्त्यावर बाहेर काढले होते. आणि ती तेथून जात होती. ती कदाचित काही विचार करीत होती. ती तिथे गेली आणि घागर खाली टाकली. आणि ती पाणी काढण्यासाठी घागर खाली टाकू लागली. आणि तिने एका पुरुषाला तिला सांगताना ऐकले, "मला पाणी प्यावयाला दे." तिने सभोवती पाहीले, आणि तिथे एक मध्यमवयीन यहुदी बसला होता.

230 ती म्हणाली, "सांगा, तुम्ही यहुदी आहात की नाही? तुम्ही असे करता कामा नये. तुम्ही माझ्याशी बोलणे हे रिती–रिवाजास धरुन नाही. मी एक शोमरोनी आहे."

231 तो म्हणाला, "परंतु जर तुला कळले असते की तुझ्याशी बोलणारा कोण आहे, तर तू...तू माझ्याकडे प्यावयास मागितले असते."

232 ती म्हणाली, "तुमचा पोहरा कोठे आहे?" समजले? "तुमची दोरी कोठे आहे?"

"ठीक आहे," तो म्हणाला, "मी जे पाणी देतो ते जीवन आहे."

233 "काय?" समजले? "का" ती म्हणाली, "आमच्या पूर्वजांनी ह्याच डोंगरावर उपासना केली. आणि तुम्ही का म्हणता की यरुशलेमेत उपासना केली पाहीजे..."

234 "ओह," तो म्हणाला, "हे खरे आहे," परंतु म्हणाला, "आम्हा यहुद्यांना ठाऊक आहे आम्ही कशाची उपासना करतो. परंतु," म्हणाला, "तुम्हाला ठाऊक आहे, अशी वेळ येत आहे की, जेव्हा—जेव्हा मनुष्य उपासना यरुशलेमेतही नाही किंवा ह्या डोंगरावरही करणार नाहीत." तो म्हणाला, "ते—ते देवाची उपासना आत्म्याने करतील, कारण तो आत्मा आहे, आत्म्याने आणि खरेपणाने." तुम्हाला ठाऊक आहे, ती त्या गोष्टींचा अभ्यास करु लागली.

आणि तो म्हणाला, "तू जाऊन तुझ्या नवऱ्याला बोलावून आण."

ती म्हणाली. "माझा नवरा? मला कोणी नवरा नाही."

235 येशूने म्हटले, "तू ठीक बोललीस." म्हणाला, "तुला पाच नवरे होते आणि आता सहावा आहे." आणि म्हणाला, "तुला पाच नवरे होते: आणि—आणि तुम्हाला ठाऊक आहे. तू ठीक बोललीस."

236 पाहा! हे काय होते? तो प्रकाश त्या बीजावर पडला. ते तेथे पडले होते, ते परमेश्वराकडून बोलले गेले होते. होय, महाशय.

237 ते बीज पृथ्वीवर होते. जेव्हा परमेश्वराने त्यावर पाणी घातले, आणि सुर्याची उब त्याला लागली, ते वर आले. ते बरोबर आहे. समजले? त्या सर्वांची त्याला गरज होती, त्यास सुर्याची आवश्यकता होती. त्यास प्रकाशांची आवश्यकता होती. होय, महाशय.

238 आणि मग जेव्हा त्याच्यातील पवित्र आत्मा, तिच्या भूतकाळातील जीवनात गेला, आणि तिला ते दाखवले, तो प्रकाश त्याच्यावर पडला. ती म्हणाली, "महाराज, आपण संदेष्टे आहा. हे आता मला समजले." ती म्हणाली, "आता आम्हाला माहीत आहे, मला माहीत आहे की, जेव्हा मसीहा येईल, तो आम्हाला ह्या गोष्टी सांगेल. आणि आमच्याकडे शेकडो वर्षापासून संदेष्टा नाही. शेकडो वर्षापासून आमच्याकडे खरा संदेष्टा नव्हता." आणि ती म्हणाली, "तू मला माझ्या नवऱ्याविषयी कसे सांगितले, आणि मला किती नवरे आहेत हे सांगितले, आणि अशा सर्व गोष्टी. का," म्हणाली "मला हे कळत नाही." म्हणाली, "जेव्हा मसीहा येईल, तो हे करणार आहे. परंतु तू कोण आहेस?"

तो म्हणाला, "मी तोच आहे."

ती तीच आहे. समजले? एक वेश्या!

239 आणि याजकांनी सभोवती पाहीले आणि म्हटले...अच्छा. त्यांच्या मंडळीला उत्तर द्यावे लागते. ते म्हणाले, "तुम्ही त्या व्यक्तिबरोबर मुर्ख होऊ नका. त्याला—त्याला भूत लागले आहे. तेच सर्व आहे." आता, पाहा. तोच फरक आहे. आजही तीच गोष्ट आहे. समजले? तीच गोष्ट आजही, ह्याचप्रकारे होत आहे. होय, महाशय.

240 तिला, हे माहीत होते, कारण प्रकाश तिच्यावर पडला होता. ते...मासेमारी करणारे, जंगली मनुष्य, शेतकरी, जकातदार, वेश्या त्यांनी त्याच्यामध्ये पाहीले होते की, साधा शास्त्रलेख काय सांगत आहे की, तो काय करील. आणि परुशी ते त्यांच्या परंपरांमुळे, पाहू शकले नाही. [भाऊ ब्रॅन्हम थांबतात आणि काही प्रकारे हावभाव करतात. मंडळी होकारार्थी प्रतिसाद देते—सम्पा.] ते त्यांच्या परंपरांमुळे, पाहू शकले नाहीत. परंतु वेश्या, शेतकरी, आणि त्यांच्यातले सर्व, त्यांनी ते पाहीले, ते सर्व पूर्वनियुक्त केलेले होते. जेव्हा संशय निघून गेले, तेव्हा ते बीज वाढू लागले. हे बरोबर आहे.

241 तिने काय केले? ती म्हणाली, "अच्छा मी आनंदीत आहे, कारण मला मसीहा भेटला आहे"? ओह, नाही, भाऊ. ती थेट शहरात गेली. ती पाण्याविषयी विसरुन गेली. ती म्हणाली, "चला, मी केलेले सर्व काही ज्याने मला सांगितले, तो मनुष्य पाहा. हीच ती गोष्ट नाही का, जे शास्त्रलेखात म्हटले आहे की मसीहा करणार आहे? हे अगदी तेच आहे की नाही?" आणि लोक तीच गोष्ट पाहू शकले.

242 जसे येशू ख्रिस्ताने, योहान 14:12 मध्ये म्हटले आहे, तसेच पुन्हा घडेल. त्याने ते लूक मध्येही म्हटले आहे. जेव्हा त्याने म्हटले, "जसे नोहाच्या दिवसात होते." देवाने त्याला एका मनुष्यामध्ये कसे प्रकट केले, आणि सांगितले त्याच्यामागे कोण होते; आणि सारा ने काय केले, तंबूत हसत आहे. आणि मलाखीतील, हे सर्व शास्त्रलेख, आणि इतर सर्व, अंतिम दिवसासाठी भविष्यवाणी करतात. इब्री 4 म्हणते, जेव्हा "वचन" परत येते.

मलाखी 4सांगते, एका मनुष्याद्वारे परत येईल. इब्री 4म्हणते, “देवाचे वचन मनातील विचारांचे परिक्षक आहे.”

243 आणि ते असे होताना पाहू शकले, आणि त्यापासून दूर गेले. त्याच्या परंपरा त्यांना लपवितात आणि ते प्रभावहीन करतात. ठीक आहे, आम्ही येथे आहोत. तेच सर्व आहे.

244 तुम्हाला माहित आहे, तो तीच गोष्ट आजही करु शकतो. तो आजही दृश्यात येतो आणि त्याच गोष्टी उत्पन्न करतो, ज्या त्याने तेव्हा केल्या. जसे त्याने सांगितले आहे की तो करील. समजले? त्याने ते करण्याचे अभिवचन दिले आहे. त्याने ते करण्याचे अभिवचन दिले आहे. आणि जर तो तीच गोष्ट करील, लावदिकीयाचा संदेशवाहक ते करणार आहे.

245 आणि मग जर लावदिकीया मंडळी ते होताना पाहते, ते अगदी तेच करील जसे इब्री मंडळीने सुरुवातीला केले. ह्याने काही फरक पडत नाही की त्यांनी ते किती चांगल्या प्रकारे प्रकट केले आहे, ओह, त्यांनी ते कसेही, केलेच आहे. ओह, माझ्या देवा!

246 आता, वचन सांगते की, असे होईल. आपण मूळ वचनाकडे परत वळू, आणि अभिवचनाप्रमाणे आम्हास प्रकट केले जाईल, ह्यासाठी की तो विश्‍वास, मुळ विश्वासाच्या पूर्वस्थितीला पुन्हा यावे. आणि जर त्याने स्वतःस प्रकट केले आहे की, तो त्याच्या लोकांमध्ये हे गोष्टी करण्याद्वारे वस्ती करीत होता; तो आपला फोटो काढण्याद्वारे हे वैज्ञानिकदृष्ट्या सिध्द करु शकला. आणि तरीही ते त्यावर विश्‍वास ठेवीत नाही. आणि कॅमेऱ्याच्या यांत्रिकी डोळ्यांनी त्याला तेथे उभे असताना त्याचा फोटो काढावा, तोच अग्नीस्तंभ, जो इब्री. 13:8 प्रमाणे “काल, आज, आणि युगानुयुग सारखा आहे.” आणि दाखवावे की वैज्ञानिकदृष्ट्या आणि इतर सर्व दृष्ट्या, आत्मिक दृष्ट्या हे सत्य प्रमाणित झालेले आहे. सर्व प्रकारे ते प्रमाणित करु शकतो, ते प्रमाणित केलेले आहे.

247 आणि, तुम्हास ठाऊक आहे, ते बहुदा तीच गोष्ट करतील. ते बहुदा त्यांपासून दूर जातील आणि ठीक तसेच करतील जसे त्यांनी केले होते.

248 ओह, परमेश्‍वरा आमचे साहाय्य कर. ओह! आपण येथे जरा थांबूया. परंतु, परमेश्‍वरा मी प्रार्थना करीतो, की आता जेव्हा आम्ही आलो आहे, तर तू हे पाहण्यासाठी आमचे साहाय्य कर. कारण, मी तुम्हाला खूप वेळ थांबवू इच्छित नाही. परमेश्‍वरा हे पाहण्यासाठी आमचे साहाय्य कर. मी विश्‍वास करतो की, त्याचा आत्मा आपल्यावर येईल, तो आता येथे आहे तो आपणास ते प्रकट करण्यासाठी, हा शिक्का उघडण्यासाठी सहाय्य करील.

249 आपण वाचूया. जसे आपण मंडळीची अवस्था पाहिली, आपण पाहिले ते कोठे होते, पाहिले ते कोठून यायला पाहीजे होते, हे तेथे पाहीले, आणि पाहीले की त्यांनी काय करायला पाहीजे होते. त्यांनी फक्त ते केले. आता तुम्ही पाहीले का आपण कुठे आहोत? तुम्ही न्याय करा. मी न्याय करु शकत नाही. मी फक्त हे वचन आणण्यासाठी जबाबदार आहे. जसे ते मला देण्यात आले, मी ते देऊ शकतो. जोपर्यंत मला देण्यात येत नाही, मी ते देऊ शकत नाही; इतर कोणीही देऊ शकत नाही.

*आणि त्याने तिसरा शिक्का फोडला, तेव्हा तिसरा प्राणी, ये, असे म्हणाला, ते मी ऐकले मग मी पाहिले तो एक काळा घोडा आणि त्याच्यावर* बसलेला *कोणीएक माझ्या दृष्टीस पडला, त्याच्या हातात तराजू होते.*

*आणि जणू काय चार प्राण्यांच्यामधून निघालेली* वाणी *मी ऐकली, ती* अशी *रुपयाला शेरभर गहू, आणि रुपयाला तीन शेर जव, तेल व…द्राक्षारस ह्यांची खराबी करु नको.*

250 आता, कोकऱ्याच्या हातात पुस्तक आहे, शिक्के फोडीत आहे. त्याने पहिला, दुसरा फोडला आहे, आणि आता तो तिसरा शिक्का फोडीत आहे. आणि जसे तो हा फोडतो, कोकरा हा शिक्का फोडतो, तिसरा शिक्का, तिसरा प्राणी...

251 आता, किती जणांना ठाऊक आहे की तिसरा प्राणी कोणासारखा दिसतो? तो एका मनुष्यासारखा दिसतो. पहिला एका सिंहासारखा दिसतो; दुसरा गोऱ्हासारखा, किंवा बैलासारखा दिसतो; आणि तिसरा, मनुष्यासारखा, मनुष्यासारखा दिसतो आणि त्याने एका जीवंत प्राण्याचा आवाज ऐकला, एका प्राण्याचा. जीवंत प्राणी, एक मनुष्यासारखा, योहानास म्हणाला, “ये, बघ ह्यात काय रहस्य लपलेले आहे.” जगाचा पाया घातल्यापासून ह्या मुक्तीच्या इतक्या वर्षांमध्ये हे ह्या शिक्क्याखाली लपलेले आहे, की काय घडणार आहे. आता, “ये आणि बघ ते काय आहे.”

252 आणि म्हणून तो ते उघडतो. मेघगर्जना होते; आणि कोकरा शिक्के उघडतो.

253 आणि, आता योहान ते काय असेल हे पाहण्यासाठी वर जातो. त्याने काय बघितले? त्याने एक काळा घोडा बघितला. आणि त्याच्या स्वाराच्या हातात, तराजू होते. आता, ही पहिली गोष्ट आहे जी त्याने पाहिली. जेव्हा कोकऱ्याने ह्याची घोषणा केली, शिक्का फोडला, तेव्हा दुसरा प्राणी...पाहा, ते प्राणी एका मागे एक येऊन. आणि सांगतात, “ये आणि बघ.” आणि जेथे योहान उभा होता, कदाचित, तो तेथे *अशाप्रकारे* उभा असेल. आणि जेव्हा कोकऱ्याने शिक्का उघडला तर तो तेथे चालत गेला...

254 जसे आपण पहिल्या शिक्क्यात पाहिले, की एक गर्जना झाली आणि ते पहाण्यासाठी दृष्टी टाकतो की काय घडत आहे. आणि तो पाहतो की एक मनुष्य प्रथम, पांढऱ्या घोड्यावर येतो. तो त्याला घोड्यावरुन खाली येताना पाहतो. आणि योहान त्याला शेवटापर्यंत जाताना पाहतो. तो त्याला पांढऱ्या घोड्यावर येताना पाहतो, त्याच्या हातात एक धनुष्य होते, आणि त्याच्याकडे बाण नाहीत. आणि नंतर तो जी गोष्ट बघतो, त्याला एक मुकूट मिळतो, आणि तो पुढे चालत जातो.

255 मग आम्हाला कळते, तेव्हा, कोकरा पुन्हा येथे येतो, तो दुसरा शिक्का उघडतो. आणि पाहतो आता येथे एक—एक लाल रंगाचा घोडा येतो. ह्या मनुष्याच्या हातात त्याची तरवार आहे. आपण वचनात पाहीले की ह्याच्या हातातील ह्या तरवारीने लोकांना मारण्यासाठी आणि पृथ्वीवरुन शांती हरण करण्यासाठी पुढे चालत जात आहे.

256 आता, कोकरा दुसरा शिक्का उघडतो. दुसरा जीवंत प्राणी, एका मनुष्यासारखा होता, म्हणतो, “ये, बघ.” आता योहान चालून जातो, हे काय आहे ते पाहतो. आणि जेव्हा त्याने पाहीले, तेथे एका स्वाराला काळ्या घोड्यावर येताना पाहीले.

257 आता, मागील रात्री आपण पाहीले की जो घोडेस्वार पांढऱ्या घोड्यावर होता तोच घोडेस्वार लाल घोड्यावर होता.

258 आणि प्राण्यांच्या मधून वाणी झाली, एक वाणी बोलली. तेथे काय आहे, हे पाहण्यासाठी तो आला तो ह्या जीवंत प्राण्यांत होता. आणि त्याने हा काळा घोडा पाहीला.

> *आणि* जेव्हा...चार *प्राण्यांच्या मधून* निघालेली *वाणी मी ऐकली, रुपयाला शेरभर गहू, आणि—आणि रुपायाला तीन शेर जव; तेल व द्राक्षारस ह्यांची खराबी करु नको.* (समजले?)

259 आपण ह्या स्वारावर, विचार–विनिमय करुया. जर तुम्ही पहिल्या स्वाराकडे लक्ष द्याल की तो कोण आहे. आणि आपण मागील रात्री वचनातून पाहीले की, दुसरा घोडेस्वार तोच व्यक्ति होता. फक्त तो दुसऱ्या घोड्यावर होता. काय झाले? त्याने त्याची सेवकाई

बदलली. समजले? बरोबर आहे. आपण पाहीले की तो एक ख्रिस्तविरोधक आहे, आणि त्याने त्याची स्थिती बदलली होती.

260 आपण पाहीले की जेव्हा तो पहिला एक पांढरा घोडा होता; तेव्हा तो एक सिध्दात झाला. आता, आपण ह्यांतील प्रत्येकाला वचनांतून पाहीले आहे. समजले?

261 आता, आपण पाहूया की, आज रात्री, आपण कोठे आहोत, दुसरी मंडळीची युगे पाहूया. समजले? आता, आपण तिसऱ्या मंडळी युगाकडे येत आहोत. समजले? तिसऱ्या मंडळीचे युग हे अगदी तिसऱ्या घोड्यासारखे आहे. समजले?

262 आता, पहिले मंडळीचे युग पाहा. ते काय होते? निकलाइतांकडे एक शिकवण होती, समजले, ती पहिलीच ठीक आहे. आणि नंतर, पहिली गोष्ट आपण जाणतो की ही निकलाईतांची शिकवण, ते मंजूर करण्यात आले. आणि ते बरोबर होते, अंमलात आणले आणि त्यांनी ह्या व्यक्तिला मुकूट घातला. नंतर, हा आत्मा, ख्रिस्तविरोधी आत्मा, एका मनुष्यामध्ये अवतरला. समजले? आणि आपल्याला कळते, नंतर, तो एक देहधारी दृश्य मनुष्य झाला. भूते निघून गेली, आणि दुष्ट मनुष्य आत आला.

263 आणि त्याचप्रकारे ती मंडळी, ख्रिस्तमंडळी पुढे जाते. ठीक त्याचप्रमाणे वधू ही विभिन्न गोष्टी घेऊन न्यायीकरण, पवित्रीकरण, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा ह्यांतून पुढे जात आहे. त्यांनी फक्त त्याचे संजीवन आधी घेतले आहे. आणि मंडळी शेवटी घेत आहे. त्यांची पहिली तीन वर्षे…त्यांच्या प्रथम तीन पायऱ्या अंधकाराच्या युगांतून गेल्या आहेत; नंतर तीन पायऱ्या, मंडळी न्यायीकरण, पवित्रीकरण, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा ह्यांतून बाहेर आली. देहधारी परमेश्वर आमच्यामध्ये प्रकट झाला. येथे सैतान ख्रिस्तविरोधीच्या रुपात, खोटा संदेष्टा म्हणून, नंतर पशू म्हणून अंधकाराच्या युगात आला. आणि मंडळी अंधकाराच्या युगातून न्यायीकरण, पवित्रीकरण, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, ह्याद्वारे बाहेर आली. अशा प्रकारे आता वचन देहधारी झाले. आणि त्याचे पतन होत जाते. तुम्हाला हे समजते काय? तो खाली जातो. खरी मंडळी वर जाते. समजले? ही गोष्ट तितकीच परिपूर्ण आहे. जितकी होऊ शकते. होय, ही खूप सुंदर गोष्ट आहे. मला ती खूप आवडते.

264 हा तोच घोडेस्वार आहे, परंतु ही त्याच्या सेवकाईची दुसरी अवस्था आहे.

265 पाहा, पहिल्या अवस्थेत, तो एका पांढऱ्या घोड्यावर आहे. तो एक शिक्षक होता. केवळ एक ख्रिस्तविरोधी शिक्षक. तो परमेश्वराच्या वचनाविरुध्द होता.

266 आणि आता तुम्ही कसे ख्रिस्तविरोधी होऊ शकता? जो कोणी हे नाकारतो की प्रत्येक वचन खरे नाही, आणि त्याच गोष्टी शिकवतो, तो ख्रिस्तविरोधी आहे. कारण ते वचनाला नाकारतात आणि तो वचन आहे.

267 आता, पहिल्या अवस्थेत, तो पांढरा घोडा, केवळ एक शिक्षक होता, परंतु त्याच्या शिकवणीत आणि त्याच्या गुणात ख्रिस्तविरोधी आत्मा होता. तो निरुपद्रवी होता. असे भासत होते की, तो कोणालाही इजा कर शकला नसता, आणि तो पुढे वाढत जातो. अशाचप्रकारे सैतान आत येतो. ओह, तो कार्यात निपूण आहे.

268 तो हव्वेला म्हणाला, "आता, तुला ठाऊक आहे की तू ज्ञान शोधीत आहेस. तुला माहीत नाही की चांगले आणि वाईट काय आहे." तो म्हणाला, "आता जर तुझे डोळे उघडले असते तुला ते काय आहे हे कळले असते." आणि तो म्हणाला, "हे फळ खूप मनोहर आहे. ते चांगले आहे. हे—हे दिसण्यात मनोहर आहे. तू ते आता खाल्ले पाहिजे. तुला ठाऊक नाही की ते असे आहे किंवा नाही, तुला ठाऊक आहे काय?"

"नाही, मला माहीत नाही. परंतु देवाने सांगितले आहे की ते करु नका."

“परंतु, ओह, ठीक आहे, मला ठाऊक आहे. परंतु...”

“परमेश्वराने सांगितले...आम्ही मरु.”

269 सैतान म्हणाला, “तुम्ही खरोखर मरणार नाही.” समजले, जितके होईल तितक्या मधुरतेने ते होऊ शकते. पाहा. त्याने काय केले.

270 पाहा, हा ख्रिस्तविरोधी आत्मा, मंडळीच्या आरंभीच्याकाळी, निकलाईताच्या शिकवणीच्या रुपात वर आला. *निको* चा अर्थ “जिंकणे” आहे, लैती म्हणजे पवित्रजन. आहे...“ठीक आहे. आम्हाला फक्त सहभागिता हवी आहे. कारण, तुम्ही येथे विखुरलेले आहात. कोणालाही माहीत नाही की कोण कुठे आहे. मला वाटते आपण सर्वांची एक संघटना असली पाहीजे. आणि ती एक भिन्न प्रकारची असली पाहीजे. पाहा, आपण जाऊया. आपल्या स्वत:ला एकत्र करुया. आपण ह्यातून एक लहानसे गृह बनवूया.” आणि हेच ते आहे. ख्रिश्चन चर्च ऑफ मेथॉडीस्ट अशी काही गोष्ट नाही. ती मंडळी नाही, ते एक लहानसे गृह आहे. बाप्तिस्ट, ही मंडळी नाही; ते एक लहानसे गृह आहे.

271 तेथे फक्त एकच मंडळी आहे, आणि ती ख्रिस्ताची रहस्यमय शरीर आहे. आणि तुमचा त्यात पूर्व नियुक्ति द्वारे जन्म झाला आहे, ते बरोबर आहे. हे खरे आहे. “जे सर्व मला पित्याने दिले आहे ते माझ्याकडे येतील. पित्याने आकर्षिल्याशिवाय मजकडे कोणी मनुष्य येऊ शकत नाही आणि जे सर्व त्याने मला दिले आहे, ते माझ्याकडे येतील.” म्हणून ते असेच आहे. तो फक्त...

272 कोकरा तेथे, मध्यस्थी करीत बसला आहे, जोपर्यंत शेवटचा जन आत येत नाही. तेव्हा ती छोटीशी घंटा वाजेल, आणि तो बाहेर निघून येईल. आणि त्याचे वतन घेईल. मग पाहा त्या सर्वांना, त्याच्या मंडळीला, त्याच्या लोकांना घरी नेईल. आणि त्याच्या शत्रूला अग्नीच्या सरोवरात टाकून देईल. आणि त्याचे सर्व लोक त्याच्याबरोबर त्यात जातील. आणि ते असेच आहे. मग आपण हजार वर्षाच्या काळात जातो.

273 तोच घोडेस्वार, आता. ह्या पहिल्या अवस्थेत, तो निरुपद्रवी होता. आणि आता जर तुम्ही दुसरी अवस्था थोडी अधिक पाहिली, थोडेसे अधिक पाहीले, तर बायबल सांगते, “त्याला एक मुकूट देण्यात आला.” आणि ते एका मनुष्याला अर्थात शक्तिशाली मनुष्याला मुकूट घालतात. पाहीले, त्याला मुकूट घातला! आणि बायबलने त्याला पोप म्हटले नाही. बायबल त्याला “खोटा संदेष्टा” सांगते. का? होय, अर्थात तो खोटा संदेष्टा असला पाहीजे, कारण तो ख्रिस्तविरोधी आत्म्याद्वारे मूळ वचनाविरुध्द शिक्षण देत होता. म्हणून तो ख्रिस्तविरोधी होता. वचन परमेश्वर आहे. पाहा, वचन ख्रिस्त आहे. ठीक आहे. आता, त्यानंतर आपण पाहतो की त्याला मुकूट घातला आहे. आणि जेव्हा त्याला मुकूट घालण्यात येतो. तेव्हा तो खूपच निरुपद्रवी आणि असहाय्य आहे. तो एक छोटा व्यक्ति आहे.

274 परंतु नंतर नाईसिया परिषदेत, त्याला ते बनविण्यात आले. आणि कॉन्स्टटाईनने त्याला सर्व मालमत्ता दिली. आणि नंतर त्याने काय केले? तेव्हा त्याने म्हणजे सैतानाने त्याला त्याचे सिंहासन आणि अधिकार दिला. बायबल तसे सांगते, कारण आपण त्याचा अभ्यास केला आहे.

275 आता, दुसरी गोष्टी आपण पाहिली की सैतान सर्व राजकारण जे आजपर्यंत झाले आहे, किंवा पुढे होईल त्याचे नियंत्रण करतो. आपण ते मत्तय 4:11 मध्ये पाहीले. आणि आता आपण पाहतो की, सैतानाकडे पहिल्यापासूनच राजकारण होते.

276 परंतु तो मंडळीवर वर्चस्व करण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून तो मंडळीला फसविण्यासाठी खाली जातो. तो त्याचे सर्वोत्तम पुरुष घेतो, त्याला एका संस्थेत कार्यरत करतो, आणि त्याला ख्रिस्तासारखा देवाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मुकूट घालतो. ख्रिस्ताने परमेश्वराऐवजी कार्य केले. पाहा, हा पुरुष परमेश्वराचे प्रतिनिधीत्व करणारा. ज्याचा अर्थ परमेश्वराऐवजी असा आहे. समजले? ठीक तसेच आहे, "परमेश्वराऐवजी," त्याला ख्रिस्ताच्याखाली विकार देवाचे प्रतिनिधित्व करणारा व्हावयास पाहीजे होते.

277 आता, त्याने केव्हा तसे केले, तेव्हा त्याने काय केले? त्याने, अर्थात सैतानाने त्याची राजकीय शक्ति घेतली, ज्यावर त्याचे अगोदरच अधिपत्य होते., आणि त्याने धार्मिक शक्ति घेतली, ज्यासाठी त्याला आधीच मुकूट घालण्यात आला होता, आणि त्यांना एकत्रित केले.

278 आणि मग त्याने स्वतःला नरकावर मुकूटमंडीत केले. आणि ते जे निघून गेले आहेत, जर त्यांनी पुरेसे पैसे दिले, तो त्यांना त्यातून बाहेर काढीत असेल. समजले? म्हणून आता तो—तो स्वर्गावर, मृतात्म्यांचा पापक्षालन ठिकाणावर विकार, देवाचे प्रतिनिधित्व करणारा होता, असे तो त्यास संबोधतो. बायबलमध्ये अशी कुठली गोष्ट नाही. समजले, परंतु त्याला काहीतरी बनवायचे आहे. बायबल सांगते की तो अथांग डोहातून बाहेर येतो. आणि त्याच मार्गाने परत जातो. आणि, पृथ्वीवर, तो एक शासक आहे!

279 आता तेव्हा त्याला काय देण्यात आले? प्रथम त्याच्याकडे एक धनुष्य होते, परंतु त्याच्याकडे कुठलाही बाण नव्हता. परंतु आता त्याच्या हातात एक फार मोठी तरवार आहे. आता तो काहीतरी करु शकतो. नंतर तो त्याच्या पांढऱ्या घोड्यावरुन खाली उतरतो. आणि तो पांढरा घोडा बाहेर निघून जातो. आता तो कशावर स्वार होतो. एक लाल घोडा, रक्त, रक्तासारखा लाल घोडा. तो वास्तवात त्यावर स्वार होतो. ओह, निश्चितच. आता त्याला मोठा अधिकार आणि मोठी तरवार, मारण्यासाठी देण्यात आली आहे, नंतर तो रक्तासारखा लाल घोड्यावर स्वार आहे.

280 आपण, हे कालरात्री, जेव्हा दुसरा शिक्का फोडला, तेव्हा दुसऱ्या शिक्क्यातून पाहीले. त्याने पृथ्वीवरुन शांती हरण केली होती. आणि एक दुसऱ्याचा वध केला होता. आणि त्याचे स्वतःची रोमन कॅथलिक चर्चचे शहीदाचे पुस्तक, दाखवते की त्यांनी त्या समयी संत हिप्पोच्या समयापासून...हिप्पोच्या संत अगस्टीन नंतर पंधराशे ऐंशीच्या आसपास सहा करोड ऐंशी लाख प्रोटेस्टंटना मृत्युच्या दारी नेले. "सहा करोड ऐंशी लाख" जर तुम्हाला ते वाचायचे असेल तर स्केमुकरचे *ग्रेट रिफॉर्म*, किंवा *ग्लोरियस रिफॉर्म* पाहा. आता शहीदी पुस्तकात अडसष्ट दशलक्ष लोकांची नोंद झाली आहे! जेव्हा त्यांच्यातील एका नावाजलेल्या संताला प्रकटीकरण मिळाले की जो कोणी रोमन कॅथलिक चर्चशी असहमत झाले तर त्यास एक बंडखोर म्हणून मारले पाहीजे, तसे प्रकटीकरण ते सर्वत्र पसरवित आहे. तो स्वार, रक्त सांडण्यासाठी गेला! तो—तो पांढऱ्या घोड्यावरुन उतरला...आणि त्याच्या लाल घोड्यावर बसला, आणि तो स्वार होऊन पुढे गेला. ओह!

281 आता त्याची महान शक्ती येते. त्याला स्वर्गाचा विकार देवाचे प्रतिनिधित्व करणारा बनविण्यात आले, आणि त्याची परमेश्वरासारखी उपासना केली गेली. पृथ्वीचा अधिकारी, मंडळ्यांना व राज्यांना एकत्रित करण्याद्वारे त्याला पृथ्वीचा अधिकारी बनवावे, आणि त्याच्यावर त्याला एक मुकूट दिला. तो जीवांना पापक्षालनाच्या ठिकाणांतून बाहेर काढण्यासाठी प्रार्थना करु शकतो. तो मध्यस्थीची प्रार्थना करु शकतो. तो पृथ्वीवर परमेश्वरासमान होता. परमेश्वराऐवजी होता. एकंदरीत, त्याच्याकडे त्या लोकांचा वध करण्याचे मोठे सामर्थ्य त्याच्याकडे होते. जे त्याच्या आज्ञांशी सहमत होणार नाही. कोण

त्याला काही सांगू शकेल. चर्च त्याला काहीच सांगू शकत नाही. कारण तो त्याचा प्रमुख आहे. राज्य त्याच्या विरुध्द काहीच बोलू शकत नाही; कारण तो त्यांचा प्रमुख आहे. म्हणून, ते लाखोच्या संख्येने मृत्यु पावले. भावांनो त्याच्यातले लहान मंडळ्या फोडल्या गेल्या, आणि मारल्या गेल्या आणि वधल्या गेल्या, आणि सिंहाना खायला दिल्या, आणि इतर सर्व गोष्टी केल्या गेल्या. समजले? "अजगर" रोमने, "त्याला त्याचे आसन आणि अधिकार दिला." बायबल तसे सांगते. समजले? म्हणून तो त्याच्या प्रतिकात्मक, लाल घोड्यांवर मानवी रक्ताद्वारे स्वार झाला, जोपर्यंत तो लाल घोडा होत नाही.

282 आता योहान त्याला काळ्या घोड्यावर पाहतो. तो आणखी, काही बदलतो.

283 आता, मला तुम्हाला हे तसेच सांगायचे आहे, जसे ते माझ्याकडे आले आहे. आणि मग आणि जर ते माझ्याकडे आले आहे आणि ते जर उर्वरित वचनाशी मेळ खात नाही. तर ते परमेश्वराने कधीच दिले नाही. पाहा, प्रत्येक वचन महान आहे. प्रत्येक वचन वचनाशी जुळले पाहीजे. आणि जे काही वचनाच्या विरुध्द आहे...जर प्रभूचा दूत मला काही सांगेल जे वचनाशी मेळ खात नाही, तर मी त्याच्यावर विश्वास ठेवणार नाही. समजले?

284 मी सांगितले, दुसऱ्या दिवशी शिकागोत जेव्हा शेकडो सेवकगण...त्या सभेत तेथे कोणी उपस्थित होते का? निश्चितच. त्या शिकागोमधील सभेत, मी म्हणालो, "आता तुम्ही सर्व त्या विषयावर बोला जो तुमच्याकडे आहे...तुम्ही मला येथे काही गोष्टीवर फसवण्याचा विचार केला आहे." अंदाजे अशाच खोलीत ती होती. मी म्हणालो, "ते काय आहे? तुम्ही ते माझ्याविरुध्द रचले आहे." मी म्हणालो, "तीन रात्री अगोदर मला पवित्र आत्म्याने दाखवले की तुम्ही प्रत्येक जण कोठे असाल? आणि आम्ही त्यात नसणार... तुम्ही येथे कार्लला विचारा जर हे बरोबर नाही."

285 आणि तेथे हँक आणि त्यांच्यातील सर्व होते. "ते बरोबर आहे." तुम्ही सर्व ऐकण्यासाठी तेथे होता.

286 मी म्हणालो, "आता तुम्ही माझ्या शिकवणीविरुध्द आहात. हेच कारण आहे. आता माझी इच्छा आहे की तुमच्यातील एकाने येथे यावे आणि तुमचे बायबल घेऊन यावे आणि माझ्या बाजूला उभे राहावे, आणि हे चुकीचे आहे असे दाखवून द्यावे." तो सगळ्यात शांत समुह होता. ज्यावषयी तुम्ही आजपर्यंत ऐकले आहे. मी म्हणालो, "तुमचे म्हणणे काय आहे?" मी म्हणालो, "जेव्हा जर तुम्हाला माहीत आहे की तुम्ही वचनाविरुध्द उभे राहू शकत नाही, तर माझ्या मागून दूर व्हा. तुम्ही डॉक्टरची पदवी घेतलेले आणि सर्वगोष्टी आणि कसे बोलत आहात, स्वतःचा परिचय 'डॉक्टर,' 'डॉक्टर,' 'डॉक्टर' देता. आणि मी..." (भाऊ वूडस आणि मी म्हणालो, अनुभवी न शिकलेले नवशिखे आहे.) "माझ्याकडे शिक्षण नाही, मी कधीच कुठल्याही सेमिनरी किंवा शाळेत गेलो नाही. परंतु तुम्ही तुमचे बायबल घ्या आणि येथे या आणि माझ्या बाजूला उभे राहा. सर्प वंश, येशूच्या नावात बाप्तिस्मा किंवा मी शिकवलेली त्यांतील कुठलीही गोष्ट चुकीची ठरवून दाखवा." कोणी एकही शब्द बोलला नाही. तुम्हाला सर्वांना ते माहीत आहे. तो तुम्ही आजपर्यंत पाहिलेला सर्वात शांत समुह होता.

287 पाहा, ते काही कावळ्याप्रमाणे बोलतात. जे मला माहीत नाही. आता, हे येथे आहे. मी लोकांबरोबर अनावश्यक वाद करण्यात विश्वास ठेवत नाही, परंतु जेव्हा अशी स्थिती येते, जेथे ते मला फसवण्याचा प्रयत्न करतात. आणि मी तेथे गेलो नसतो, परंतु पवित्र आत्म्याने मला सांगितले, म्हणाला, "तेथे जा; मी तुझ्या बाजूला उभा राहीन."

288 मी त्यांना तीन किंवा चार दिवसां अगोदरच सांगितले होते. तुम्ही सर्व तेथे होता, आणि—आणि श्रीमान कार्लसन आणि त्यांना, आणि टॉमी हिक्सना ऐकले. आणि ते सर्व

तेथे बसले होते. आणि तीन चार दिवस अगोदर मी तेथे गेलो आणि मी सांगितले, "तुम्ही ती जागा रद्द करणार आहात."

289 ती वादळी रात्र होती. मी एका सभेत हतो. तो म्हणाला, "जा, त्या खिडकीपाशी त्या तिसऱ्या लहान दरवाजाकडे उभा राहा." आणि मी तेथे गेलो आणि ठीक तेथे उभे राहीलो. मी तेथून बाहेर पाहीले.

290 त्याने सांगितले, "त्यांनी तुझ्यासाठी सापळा रचला आहे. ते तुला मीनीस्टेरिअल असोशिएशन ऑफ ग्रेटर शिकागो येथे बोलण्यासाठी सांगतील." "त्यांनी तुझ्यासाठी माझ्या वचनावरील तुझ्या शिकवणीवर सापळा रचला आहे."

291 त्याने म्हटले, "आता ते ती जागा रद्द करणार आहेत. त्यांना ती मिळणार नाही. आणि ते अशा ठिकाणी सभा करणार आहेत जेथील भिंती तपकिरी रंगाच्या आहेत." "येथे ती दिसत आहे." मागे तेथे मी थांबलो, आणि मी स्वतःला एका कोपऱ्यात पाहीले; मी त्या सर्व सेवकगणांना तेथे ठीक तसेच बसलेले पाहीले, जसे ते बसलेले होते. मी त्या सर्वांकडे पाहीले. आणि तो म्हणाला…

292 मी विचार केला, "ओह, प्रभू, जर ते तसे करणार असतील, तर मी तेथे न जाणे बरे. मी त्यांच्या भावना दुखवू इच्छित नाही किंवा काही चुकीचे करु इच्छित नाही."

त्याने म्हटले, "जा. मी तुझ्या बाजूला उभा राहीन." त्याने तसेच केले. ते बरोबर आहे.

293 आता, तुम्ही सर्व ह्या गोष्टीचे साक्षीदार आहात, जे तेथे बसलेले होते. आणि त्यांना माहीत आहे की हे खरे आहे. हे बरोबर आहे. तुमच्याकडे येथे टेप आहेत. परंतु, तुम्ही पाहा, की तुम्ही तेथे आहात.

294 आता, येथे ह्याचे रहस्य आहे. ती, जेव्हा ह्या सकाळी दिवस उजाडण्याअगोदर मला प्रकट करण्यात आली. तेव्हा मी लगेच वचनाकडे गेलो आणि ते पाहू लागलो, ते शोधून काढले. तेथेच हे होते. त्यांच्यातील तीन, ह्या वेळेपर्यंत, पूर्णपणे, अद्भूत रितीने प्रकट करण्यात आले होते. होय आता येथे काळ्या घोड्याचे रहस्य आहे, जसे मला प्रकट करण्यात आले होते.

295 तो त्या काळ्या घोड्यावर अंधकार युगाच्या समयात स्वार झाला आहे. तो काळा घोडा हेच दर्शवितो, ते अंधकाराची युगे दर्शवितात. कारण खऱ्या विश्वासणाऱ्यंसाठी जे राहीले होते, त्यांच्यासाठी हा मध्यरात्रीचा समय होता. आता त्या मंडळी युगात, त्या मध्य मंडळीचे युग, अंधकाराचे मंडळी युग होते. पाहा, त्याने कसे सांगितले, "तुमच्याकडे मात्र थोडे सामर्थ्य आहे." खऱ्या विश्वासणाऱ्यांसाठी, त्यांना ती मध्यरात्र होती. आता पाहा. प्रत्यक्ष व्यवहारात मंडळीकडून सर्व आशा घेतल्या होत्या, कारण ह्या व्यक्ति मंडळी आणि राज्य ह्या दोघांवर नियंत्रण करतो. ते कार्य करण्यास जात आहेत? समजले, कॅथलिकवादाने मंडळी आणि राज्य हे दोन्हीवर अधिकार घेतला आहे. आणि सर्व जे कॅथलिक वादाबरोबर सहमत होत नाही, ते मारले गेले होते. हेच कारण आहे की तो काळ्या घोड्यावर होता. आणि पाहा त्याने काय अंधाराचे काम केले, तेव्हा तुम्ही हे पाहू शकता. आणि तुम्ही केवळ…जर तुम्हाला तुमचा इतिहास ठाऊक आहे, तुम्ही ते पाहा. तुम्हाला ते समजावे लागणार नाही, हे समजण्यासाठी आता पाहा. सर्व आशा संपली होती. हा त्याचा काळा घोडा होता.

आता, तो धूर्तपणात, आपल्या पांढऱ्या घोड्यावर स्वार झाला.

296 तेव्हा त्याला सामर्थ्य देण्यात आले होते. त्याने शांती हरण केली होती, लाखो लोकांची कत्तल केली. हेच तो करणार होता. जेव्हा तो घोड्यावर स्वार झाला होता. आणि तो आजही तसे करीतो. समजले?

297 आता, येथे तो त्याच्या काळ्या घोड्यावर, येत आहे. तो अंधकाराच्या युगाचा समय होता. जेव्हा चर्च स्थापित झाले, आणि तिच्याकडे सामर्थ्य आले. तेव्हा इतर सर्व गोष्टींना त्यांनी गुदमरुन मारले होते. आणि असे पर्व शेकडो आणि शेकडो आणि शेकडो वर्षे चालत राहीले, ज्यास प्रत्येक वाचक अंधकाराचे युग म्हणून ओळखतो. किती जण ते जाणतात. [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] निश्चितच अंधकाराची युगे. तेथे तुमचा काळा घोडा आहे, जो काळ्या युगाला दर्शवितो. आता सर्व आशा संपल्या होत्या; कुठलीच आशा नव्हती. थोड्याशा विश्वासणाऱ्यासाठी, सर्वकाही अंधार दिसत होता. आता हेच कारण आहे, की ह्यास अंधकाराचे युग म्हटले गेले आणि तो काळा घोडा, अंधकाराच्या समयाला दर्शवितो.

298 तुम्ही पाहता की, "त्याच्या हातात तराजू होते." वाणी देत होता, "रुपयाला शेरभर गहू, आणि रुपयाला तीन शेर जव." पाहा, वास्तवात गहू आणि जव हे जीवनासाठी नैसर्गिक आहार आहे. त्यापासून रोटी आणि आहार बनवला जातो. परंतु, तुम्ही पाहता, तो त्यासाठी किंमत घेत आहे. ह्याचा अर्थ काय आहे, तो त्याच्या लोकांना एक प्रकारची जीवनाची आशा जी त्यांच्यामधून तो पाठवीत आहे, त्यासाठी किंमत घेत आहे. असे करण्याद्वारे...त्याने त्याच समयी त्यांच्याकडून प्रार्थनेसाठी पैसे वसूल करीत आहे. प्रार्थनेसाठी पैसे वसूल करीत आहे. ते अजूनही ते करीत आहे; नोवेना वगैरे.

299 तो हे का करीत होता? जगाची संपत्ती त्याच्या ताब्यात घेत आहे. तो तराजूने, वजन करीत होता, "रुपयाला शेरभर गहू; रुपयाला तीन शेर जव." स्वार काळ्या घोड्यावर आहे, पाहा, तो भाग पाडीत आहे...त्याच्या लोकांना त्याचे धन हडपण्यासाठी मारत आहे. बायबल भविष्यवाणी करते की, तो, जवळ-जवळ, जगाची संपत्ती त्याच्या ताब्यात आहे. जसे आपण मागील रात्री रशियाविषयी बोललो, आणि ते सर्व, त्यांचे धन त्यांनी घेतले आहे आणि ते लोकांना त्याचे जे सर्व आहे ते घेण्यासाठी कोडे मारत आहेत. म्हणून, तुम्ही तेथे आहात.

300 आता लक्ष द्या, तुम्ही पाहा की मंडळीत पैसा घेणारे कोठून आले? तशा प्रकारच्या व्यर्थ गोष्टींपासून दूर जा; जे एक संस्था बनवण्यासाठी किंवा भव्य इमारत बांधण्यासाठी लाखो डॉलर, वसूल करतात. आणि—आणि तुम्ही पाहता की त्यांची आई कोण आहे?

301 प्रभू, तुझा धन्यवाद होवो. ओह, माझ्या परमेश्वरा. मी अत्यंत आनंदीत आहे. होय, महाशय, हे खरे आहे. ही त्याची कृपा आहे, हे खरे आहे. सर्व ठीक आहे.

302 तो मध्यरात्रीचा समय होता. तुम्हाला आता हे कळते का? [मंडळी म्हणते "आमेन"—सम्पा.] आणि येथे तो जीवनावश्यक वस्तूसाठी किंमत घेत आहे, ते त्याची जव आणि भोजन वस्तू होती. भौतिक वस्तू आहेत, आत्मिक नाहीत. ते जव होते, समजले, आणि जी जवाची रोटी आणि गव्हाची रोटी होती. तो तशाप्रकारचे जीवन जे तो आपल्या लोकांना त्याची किंमत घेऊन देत होता. याजकांद्वारे केलेल्या प्रार्थनेसाठी धन घेत होता. लोकांना मृतात्म्यांच्या पापक्षालनाच्या ठिकाणातून काढण्यासाठी तो पैसे घेतो. पैसे घेत आहे! आता, हे मी इतिहासातून सांगत आहे. मला वाटते, तो नोवेना होता. ज्यासाठी तो पैसे घेत होता, मला वाटते ह्याविषयी सर्व जणांना माहीत आहे. मला वाटते, की तुम्हाला माहीत आहे की नोविनात तुम्हाला काही तप करावे लागते. त्यासाठी कोणाला पैसे वसूल करावे लागतील. जगाची सर्व संपत्ती त्याच्याकडे आणित आहे,

त्याच्याकडे त्याच्या कलिसियात आणित आहे आणि तो अजूनही घोड्यावर जात आहे. ओह, निश्चितच जात आहे. होय, महाशय. अजूनही स्वार आहे!

303 लक्ष द्या. येथे, आता चांगला भाग आहे. लक्ष द्या.

*...पाहा. तेल व द्राक्षारस ह्यांची खराबी करु नको.*

304 "तेथे त्याचा थोडासा अंश राहीला आहे, परंतु तू त्याला स्पर्श करु नको!"

305 आता, तेल हे...आत्म्याला, पवित्र आत्मा दर्शविते. जर तुम्हाला पाहीजे असल्यास, मी तुम्हाला काही वचने देतो. तेथे दोन वचने आहेत. लेवीय 8:12 तुम्हाला माहीत आहे. अहरोन जेथे आत जाण्याअगोदर, त्याला तेलाचा अभिषेक करावा लागला होता. आणि जखऱ्या 4:12 मध्ये सांगितले आहे, की तेल येत होते, तोट्यांमधून तेल वाहत होते, आणि म्हणाला, "हे तेल माझा आत्मा आहे." आणखी एक गोष्ट, जर तुम्हाला पाहायचे असेल तर तुम्ही मत्तय 14...25 तेथे मुर्ख कुमारी होती, किंवा 25:3 मुर्ख कुमारीकडे तेल नाही. आत्मा नाही. आणि मत्तय 25:4 शहाण्या कुमारींच्या दिव्यात तेल होते. त्या पवित्र आत्म्याने पूर्ण होत्या. आत्मा! तेल आत्म्याला दर्शविते. ओह, महिमा होवो! [भाऊ ब्रॅन्हम आपल्या हातांनी एकदा टाळी वाजवतात—सम्पा.] ठीक आहे; तुम्हाला हे समजत आहे? [मंडळी म्हणते, "आमेन."] ठीक आहे. आता तेल आत्म्याला दर्शविते.

306 आणि द्राक्षारस प्रकटीकरणाच्या उत्तेजनास दर्शवितो. पवित्र आत्मा. ओह, मी—मी सर्व ठिकाणी आनंदाने धावू इच्छितो. मला आश्चर्य वाटते की माझ्या शेजाऱ्याला उठवले नाही. जेव्हा प्रभूने मला हे दाखवले, "प्रकटीकरणाची उत्तेजना," समजले?

307 बायलमध्ये तेल आणि द्राक्षारस हे नेहमीच एकत्र दाखवले जातात. माझ्याकडे शब्दांच्या सूचीचे पुस्तक आहे आणि मी त्यात पाहीले आहे. त्याची *एक* मालिका आहे. म्हणून द्राक्षारस आणि तेल सदैव एकत्र दाखवले जातात. समजले?

308 जेव्हा देवाच्या अभिवचनाद्वारे दिलेल्या वचनाचे सत्य त्याच्या संतांना जे तेलाने परिपूर्ण होते सत्याने प्रकट झाले, तेव्हा ते सर्व उत्तेजीत झाले. द्राक्षारस एक उत्तेजना आहे. गौरव असो! मी आता ते अनुभवत आहे. आनंदाने उत्तेजीत होऊन आरोळी मारा. समजले? आणि, जेव्हा त्यांनी असे केले, त्यांच्यावर तसाच परिणाम झाला, जसा द्राक्षारसाने स्वाभाविक मनुष्यावर होतो. कारण जेव्हा देवाच्या सत्याचे प्रकटीकरण देण्यात आले आणि खरे विश्वासी तेलाने भरले, आणि प्रकटीकरण प्रकट झाले, त्याच्यामध्ये इतकी अधिक उत्तेजना आली की तो असामान्य रितीने वागू लागला. हे बरोबर आहे. महिमा! [मंडळी आनंदीत होते—सम्पा.] समजले, तीच स्थिती आता त्यांची आहे. हे बरोबर आहे, तो त्यांना अयोग्यरित्या वागणअयास प्रवृत्त करते.

309 आता जर तुम्हाला ह्यावर वचने हवी असतील, तर प्रेषित 2वाचण्यास सुरुवात करा. ते कोठे होते? त्यांच्याकडे एक अभिवचन होते. जे त्यांना देण्यात आले होते... ते वचनानुसार प्रकट केले गेले....आता, जर तुम्ही पाहीले...जेव्हा सर्व पवित्र आत्म्याचे अभिवचन त्यांच्यावर ओतण्यात आले...

310 जर ते असे बोलले असते तर काय झाले असते..."आता थांबा, त्याने आपल्याला येथे आपल्या सेवकाईसाठी थांबून राहण्यास सांगितले आहे." आणि आठ दिवसांनी ते म्हणतील, "अच्छा, मुलांनो मी तुम्हाला सांगतो," मार्क मत्तयला म्हणाला, "मला वाटते आपल्याला तो अगोदरच मिळाला आहे. तुम्हाला असे वाटत नाही का? पाहा, तो आपल्याला अगोदरच मिळाला आहे. आता जेव्हा आपण आपल्या सेवकाईसाठी वाट पाहत आहोत, आपण जरा प्रचारासाठी बाहेर गेले पाहीजे. त्याने आपल्याला

येथे वर येण्यास आणि वाट पाहण्यास सांगितले आहे, आणि येथे आपण आठ दिवसांपासून आहोत.”

“ठीक आहे. आपण आणखी एक दिवस थांबूया.”

311 नववा दिवस आला. तेव्हा मार्क तेथे येतो. किंवा—किंवा—किंवा, कदाचित त्यांच्यातील एक योहान म्हणाला, “मला—मला—मला वाटते की आपण आणखी थांबता कामा नये. मझा विश्वास आहे तो आपल्याला अगोदरच मिळाला आहे. तुम्ही असा विश्वास करत नाही का?”

312 नंतर मी शिमोनाला येताना पाहू शकतो, कारण तुम्हाला माहीत आहे, की त्याच्याकडे किल्ल्या आहेत. “आता, मुलांनो तुम्ही एक मिनिट थांबा! वचनाला ह्याविषयी काही सांगायचे आहे. त्याने आम्हाला किती दिवस थांबायचे हे कधीच सांगितले नाही. त्याने सांगितले, ‘तुम्ही तेथे तोपर्यंत थांबा! तुम्ही तेथे तोपर्यंत थांबा, जोपर्यंत योएल संदेष्ट्याची भविष्यवाणी पूर्ण होत नाही, जोपर्यंत यशयाची भविष्यवाणी पूर्ण होत नाही.’”

313 “मी ह्या लोकांशी तोतऱ्या ओठांनी आणि निरनिराळ्या भाषेत बोलेन. आणि हा एक ताजेतवानेपणा आहे.” हा द्राक्षारस आहे, जो ओतला गेला होता. बायबलमध्ये द्राक्षारस काय आहे? ताजेतवानेपणा आहे. “हा ताजेतवानेपणा आहे जो प्रभूच्या उपस्थितीपासून येतो.” समजले? तो—तो वचनानुसार असला पाहीजे. समजले?

314 म्हणून, तुम्ही बघितले, की द्राक्षारस प्रकटीकरणाद्वारे आलेले उत्तेजन आहे. आणि जेव्हा पवित्र आत्म्याचा वर्षाव होतो, आणि त्यांनी परमेश्वराच्या अग्नीचा त्यांच्यावर वर्षाव होताना पाहीले. ओह माझ्या प्रभू, त्यांच्यात उत्तेजन येण्यास सुरुवात झाली. आणि तुम्हाला माहीत आहे. पहिली गोष्ट जी घडली, ते इतके मस्त झाले की लोक वास्तवात विचार करु लागले की ते द्राक्षारसाने मस्त झाले आहेत, परंतु ते प्रकटीकरणाद्वारे उत्तेजीत झाले होते. हेच ते आहे! परमेश्वराने प्रकटीकरण सिध्द केले आहे. त्यांना स्पष्ट केले. त्याविषयी ते आनंदीत झाले होते. परमेश्वराने ह्याचे त्यांना अभिवचन दिले होते. येथे ते त्यांना प्रकट करण्यात आले. आणि त्यांना वचनाची सत्यता शाबित करण्यात आली. आमेन! येथे एक मनुष्य उभा होता, म्हणत होता. “हा तोच आहे! हा तोच आहे!” आणि तेथे तोच होता, जो त्याच चिन्हाद्वारे शाबित करण्यात आला जी आपल्याकडे आज आहेत. तेथे—तेथे प्रकटीकरणाद्वारे उत्तेजना आली होती. समजले? आणि, आता, तेव्हा त्याच्याकडे तो खरोखरीच होता.

315 हेच कारण आहे की पेत्र तेथे बाहेर जाऊ शकला, आणि म्हणू शकला, “अहो यहुदी लोकांनो आणि यरुशलेमेतील रहिवाश्यांनो, हे लक्षात आणा आणि माझे बोलणे ऐकून घ्या, तुम्ही सर्व दैवी ज्ञानाची पदवी सम्पादन केलेले डॉक्टर्स, जे मी तुम्हाला सांगणार आहे त्याकडे लक्ष द्या, समजले.”

316 ओह, किती अद्भूत आहे! प्रकट झाले! प्रकट झाले! जेव्हा त्यांनी वचन सिध्दीस होताना पाहीले, ते अत्यंत उत्तेजीत झाले. तो सदैव तसेच करतो. ते सर्वदा तसेच करते.

317 जेव्हा मी पाहीले की परमेश्वराने ह्या दिवसात काही गोष्ट करण्याचे अभिवचन दिले आहे, जेव्हा त्याने ह्या अंतिम दिवसात शिक्के फोडण्याचे अभिवचन दिले आहे! आणि तुम्ही तो आनंद, ती महिमा जाणत नाही, जेव्हा मी त्याला हे प्रकट करताना, तेथे उभे असलेला आणि ह्या गोष्टी घडताना पाहीले! आणि तुम्ही हे समजून घ्या की, कोणाही व्यक्तिला घेऊन सांगतो, की त्याने कधीही एकही गोष्ट आपल्याला सांगितली नाही. परंतु जशी सांगितली त्याचप्रकारे घडली. आणि जेव्हा मी त्याचे ह्या अंतिम दिवसासाठी केलेले अभिवचन पाहतो जसे त्याने करण्याचे अभिवचन दिले आहे. तेव्हा तुम्ही माझ्या हृदयातील आनंद

पाहा. आणि येथे मी ते शाबित होताना आणि पूर्णपणे खरे होताना पाहतो. मी फक्त...तुम्ही मला सांगताना ऐकले आहे, "मी स्वतःला धार्मिकपणाचा अनुभव करतो," तेच कारण आहे. उत्तेजना इतकी वाईट आहे, की मी—मी—मी आनंदाच्या भरात कापण्यास तयार होतो, तुम्हाला माहीत आहे. प्रकटीकरणापासून उत्तेजना मिळते. ही गोष्ट खरी आहे.

318 ते प्रकटीकरणामुळे इतके मस्त (उत्तेजीत) झाले की त्यांनी अभिवचन शाबित केले. तेथे आनंदाने ते प्रेरित झाले, की लोक म्हणाले, की, "त्यांनी नविन द्राक्षारस प्यायले आहेत." जेव्हा परमेश्वराने त्याचे अभिवचन त्यांना प्रकट केले. आणि त्याने ते केवळ प्रकट केले नाही, परंतु त्याने ते शाबित केले.

319 तेच तर मी सदैव सांगितले आहे, मनुष्य काहीही सांगू शकतो, तो काहीही त्वरीत सांगू शकतो. परंतु जेव्हा परमेश्वर सभोवती येतो. आणि त्याची सत्यता शाबित करीतो!

320 आता, बायबल सांगते, "जर तुमच्यामध्ये कोणी असेल, जो त्यास आध्यात्मिक अथवा संदेष्टा आहे असे म्हणतो, जर तो काही गोष्टी सांगतो आणि त्याप्रमाणे घडत नाही, तर त्याच्याकडे तुम्ही लक्ष देऊ नका. त्याची मुळीच भीती बाळगू नका. त्या मनुष्याची भीती बाळगू नको. परंतु जर तो काही बोलला आणि तसे घडले, तर तुम्ही समजा की तो मी आहे, मी, मी त्याच्यात आहे. ते हे सिध्द करीते मी का आहे."

321 आणि तेव्हा ती लहानशी शोमरोनी स्त्री. जेव्हा शास्त्रलेख सांगतो की, मसीहा ह्या गोष्टी करील, आणि येथे तो उभा आहे आणि त्याने तेच केले जे शास्त्रलेखात म्हटले आहे. ती म्हणाली, "तेथे तो आहे. या, तो मनुष्य पाहा! ह्या त्याच गोष्टी नाहीत का ज्याविषयी वचनात सांगितले होते की, असे घडले?" पाहा, ती प्रकटीकरणाद्वारे उत्तेजीत झाली. ते बरोबर आहे का? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] ती प्रकटीकरणामुळे उत्तेजीत झाली, तेव्हा ते सिध्द झाले. समजले? ते बरोबर आहे. तिला माहीत होते की तेथे...

322 "आम्हाला माहीत आहे की मसीहा येणार आहे, ज्याला ख्रिस्त म्हणतात. आणि जेव्हा तो येईल, तो ह्या गोष्टी करील." तिने ते पाहीले.

आणि तो तीला म्हणाला, "मी तोच आहे."

323 तेव्हा उत्तेजना सुरु झाली आणि ती ओरडत गेली आणि खाली त्या नगरात गेली. तीने तीची जुनी घागर टाकली, आणि ती तेथे गेली आणि लोकांना म्हणाली, "या, बघा!"

324 आता, जर तुम्ही पूर्वेकडील रितीरिवाज जाणता, तर तुम्हाला कळेल की त्या स्त्रीला तसे करणे अनुचित होते. होय, महाशय, तशा प्रकारची स्त्री, जीचे कोणी ऐकले नसते. नाही, महाशय, तिच्यावर एक खूण होती, आणि जेव्हा ती...जर ती अशाप्रकारे रस्त्यावर गेली असती. आणि तशी वागली असती, तर रस्त्यावरील लोकांनी तिच्याकडे लक्ष दिले नसते.

325 परंतु, भावा, तिच्याकडे तेथे जीवनाचे वचन होते! ती प्रेरित झाली होती. तुम्ही करु शकता...हे असे होते. जणू काही वादळाच्या दिवशी आपल्या घराला आग लावणे. ओह तेथे काहीतरी त्यास हवा देत होते! ती—ती तयार होती: होय, ते त्यास विझवू शकत नव्हते. तो परमेश्वराचा अग्नी जळत होता. होय, महाशय, ती म्हणाली, "जर तुम्ही अशाप्रकारे ठेवीत नसाल, तर तुम्ही फक्त तेथे या जेथे ती सभा चालू होती. मी ते तुम्हाला दाखवीन." होय, हेच ते आहे. होय. होय, महाशय.

326 आणि म्हणून लोक तेथे बाहेर गेले. आणि त्याने ते पुन्हा एक वार केले नाही. परंतु त्यांना माहीत पडले की काहीतरी त्या स्त्रीबरोबर घडले आहे. ती बदलली आहे, म्हणून त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. होय, महाशय. त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला.

327 कारण, “विश्वास ऐकण्याने येतो, ऐकणे देवाच्या अभिवचनाने, देवाच्या वचनाने होते, आणि पाहा ते वास्तविक होताना पाहणे,” कारण ते बीज आहे. आणि जेव्हा ते पेरले गेले, ते जीवन घेते. ते तेच उत्पन्न करील ज्याविषयी ते बोलत आहे. जर ते तसे उत्पन्न करीत नाही. तर ते परमेश्वराचे बीज नाही. किंवा पेरणाऱ्याला ते कसे पेरावे हे माहीत नाही; तो परमेश्वराने बीज पेरण्यासाठी पाठविलेला नाही. तो ते खडकावर किंवा इतर कशावर पेरीत असेल समजले? म्हणून—म्हणून तुम्ही पाहा, पेरणारा बी पेरीत आहे, परमेश्वर त्याची काळजी घेतो, ते योग्य जागेत पडते, तुम्हाला समजते. बापरे!

328 तेव्हा त्याने ह्या काळया घोड्यावरच्या स्वारास काय सांगितले? “तू माझा द्राक्षारस आणि माझ्या तेलाची खराब करु नकोस! तू त्यास स्पर्श करु नको. माझा द्राक्षारस आणि तेल ह्याची खराबी करु नको. माझ्याकडे खाली तेथे थोडेसेच आहे, परंतु तेथे अजूनही थोडेसे आहे. आता तू पुढे जाऊ शकतो. आणि ते सर्व प्रकारचे जीवन जे तू नष्ट करीत आहे ते मोजू शकतो. ते तुझ्यावर आहे. तुला खाली तेथे त्यासाठी पैसे द्यावे लागतील. परंतु जेव्हा तू ह्या द्राक्षारस आणि तेलाकडे येशील, तू ते सोडून दे.” ओह, माझ्या प्रभू! जर तुम्ही करु शकता...

329 दुसऱ्या शब्दात त्याने असे सांगितले असेल, “जर तू माझ्या काही लहान कळपाला, जे माझ्या तेलाने आणि द्राक्षारसाने भरलेले आहे. अर्थात माझ्या शुध्द वचनाने तेल आणि द्राक्षारस भरलेले आहे, पकडशील आणी पाहशील, आणि तू त्यांना मारण्यास जात आहेस. कारण तू तसेच करीत आहेस, तेच तू करीत आहेस, तू त्यांना कुठलीही, ‘हेल मेरी,’ किंवा तशा इतर गोष्टी किंवा तुझ्या काही मतप्रणाली प्रमाणे चालण्यास बळजबरी करु नको. तू तुझे हात त्यांच्यापासून दूर राख. त्यांना ठाऊक आहे की ते कोठे जात आहे, त्यांना माझ्या तेलाने अभिषेक केला आहे. आणि माझ्या तेलाचा अभिषेक केलेला असल्याकारणाने, त्यांच्याकडे द्राक्षारसाचा आनंद आहे. कारण त्यांना माझ्या अभिवचनाचे वचन ठाऊक आहे, ‘मी त्यांना पुन्हा उठवणार आहे.’ म्हणून त्यांची खराबी करु नको! त्यांना नासधूस करण्याचा प्रयत्न करु नको. कारण, फक्त त्यांच्यापासून दूर राहा. नाही.” सगळे...

330 तो त्याचे वचन शाबित करतो आणि आत आणतो. त्यांना ठाऊक आहे. त्यांना माहीत आहे की ते पुन्हा उठतील. ओह, मला ते किती आवडते! ओह! ते पुन्हा उठतील. येथे आता काळा घोडा येतो, अंधकाराच्या युगात येतो.

331 तेथे पांढरा घोडा गेला, आपण पूर्णरितीने पाहीले की, त्याने काय केले. येथे आता लाल घोडा येतो; आपण ते पूर्णपणे पाहीले की त्याने काय केले. आणि आता काळा घोडा येतो. तुम्ही पाहिले की सर्व समयी तोच स्वार आहे, तो सर्व समयात तो काय करीत आहे.

332 आता आपण पाहीले की तो गहू अर्थात स्वाभाविक जीवनास तोलत आहे. आणि त्यासाठी पैसे घेत आहे. एक त्यावरच ते जगत होते.

333 परंतु, तेल आत्म्याला आणि द्राक्षारस उत्तेजनास दर्शवितो. “ते आत्मिक जीवन आहे, त्याची खराबी करु नको. ते तसेच राहू दे.” दुसऱ्या शब्दात, “रोम, तू त्यांस स्पर्श करु नको! ती माझी आहेत. ते माझ्या मालकीचे आहेत!”

334 आता येथे माझ्याकडे एक आणखी गोष्ट आहे जी तुम्हाला कळावी अशी माझी इच्छा आहे. लक्ष द्या. त्या चार प्राण्यांतील एकही ते बोलत नाही. “तेल आणि द्राक्षारस त्यास स्पर्श करु नको.” तुम्ही त्याकडे लक्ष दिले का? ते चार प्राणी बोलत होते, परंतु...लक्ष द्या, मला येथे थोडे वाचू द्या. आता पाहा.

*...रुपयाला शेरभर गहू, आणि—आणि...रुपयाला तीन शेर जव. तेल...
व द्राक्षारस ह्यांची खराबी करु नको.*

335 आता येथे लक्षपूर्वक ऐका.

*आणि मी—आणि मी चार प्राण्यांच्या मधून निघालेली वाणी ऐकली...*

336 ती काय होती. तो कोकरा होता! आमेन! ती वाणी त्या चार प्राण्यांची नव्हती. कोकरा ते म्हणाला, का? तो त्याचा भाग घेण्यास जाणार आहे. तो त्याचा आहे. त्याने तो सोडविला आहे. समजले? आमेन! "तुम्ही त्या तेलाला स्पर्श करु नका!" नाही, महाशय. चार प्राण्यांनी नव्हे, परंतु तो कोकरा होता ज्याने हे म्हटले, आणि, ओह माझ्या प्रभू, तो कोकरा! चार प्राण्यांनी ती घोषणा केली नाही. कोकरा स्वत: ते बोलला.

337 जेव्हा ते चार, प्राणी बोलले, "या आणि बघा," आणि ते गेले, आणि त्यांनी ते ह्याप्रकारे पाहीले.

338 आणि तो म्हणाला, "रुपयाला शेरभर गहू, आणि रुपयाला तीन शेर जव...आणि एवढे *ह्यासारखे* आणि एवढी जव." परंतु तेव्हा कोकरा त्याच्यामध्ये ओरडून बोलला, "परंतु तेल व द्राक्षारस ह्याची खराबी करु नका!" होय, हे बरोबर आहे. ओह, माझ्या प्रभू! ते लक्षपूर्वक ऐका, "मुला तू ह्याची खराबी करु नको, नाहीतर एके दिवशी तुला त्यासाठी किंमत मोजावी लागेल." ओह, माझ्या प्रभू.

नऊ वाजून तीस मिनिटे झाली आहेत.

339 अच्छा, माझ्या समजेप्रमाणे आणि जे मी जाणतो, आणि त्या सर्व मी ज्याचा मी विश्वास अंतःकरणापासून करतो. तो ह्या तीन शिक्क्यांचा खरा अर्थ आहे. मी त्यासाठी परमेश्वराचे आभार मानू इच्छितो. आणि मी हे म्हणेन, की हे प्रकटीकरण आहे. जे त्याने मला दिले. त्याने मला त्याचे प्रकटीकरण दिले. आणि मी विश्वास करतो की आपण अंतिम दिवसात राहत आहोत.

340 उद्या रात्री आपण फिकट रंगाचा घोडेस्वार पाहणार आहोत. आणि आता मला माहीत नाही. मला माहीत नाही. परमेश्वराला ठाऊक आहे ते सत्य आहे. मला त्याविषयी एकही गोष्ट ठाऊक नाही. नाही.

341 मी माझ्या जुन्या संदर्भावर पाहीले जे माझ्याकडे वर्षापूर्वीपासून आहेत. काही वेळा अगोदर मी भाऊ ग्राहम स्नेलिंगला पाहीले; तो बाहेर गेला असेल. परंतु, मला लक्षात आहे जेव्हा मी येथे प्रचार करीत होतो. मी वर दृष्टी टाकली हे पाहण्यासाठी की वर्षांअगोदर काय सांगितले एक दिवस मी प्रकटीकरणाच्या पुस्तकावर प्रचार करीत होतो, मी सर्व चार घोडेस्वार एकाच वेळी घेतले होते.

342 मी म्हणालो, "ह्यात काही संशय नाही की पांढरा घोडा आरंभीची मंडळी दाखवितो." मी ते अडवेंटस्टेच्या पुस्तकांतून वाचले होते. आणि मी तेथे काही गोष्टी वाचल्या. मी सांगितले होते, "ती आरंभीची मंडळी होती जी विजय मिळवीत पुढे गेली" आणि नंतर एक काळा घोडा होता, मी...मी आता विसरलो, की काळ्या घोड्याला मी काय संबोधले होते. मी म्हटले, किंवा अधिक खरे म्हणजे लाल घोडा.

343 मी म्हणालो, "ह्या घोड्याचा" कदाचित अर्थ असेल की "संकट मार्गात आहे आणि त्याचा अर्थ असा आहे की पुष्कळ युध्दे होणार किंवा काही असेच होईल." मी म्हणालो, "कदाचित तेथे पुष्कळ युध्दे होतील." मी म्हणालो, "हेच आहे. जे झाले आहे." आणि तेव्हा मी म्हणालो, "फिक्का घोडा..."

344 किंवा, “काळा घोडा,” मी म्हणालो की, “त्याचा—त्याचा अर्थ तेथे—तेथे कदाचित पृथ्वीवर अंधकाराचा काळ येईल, जेव्हा सर्व तारे चमकणे बंद करतील, सूर्य मावळेल, आणि चंद्र त्याचा प्रकाश देणार नाही.” मी म्हणालो, “त्याचा कदाचित अर्थ तसा असेल.”

345 मी म्हणालो, “फिक्कट रंगाचा घोडा, त्याचा अर्थ पुष्कळ आजार येणार आहेत.” आता मला माहीत नाही की त्याचा अर्थ काय आहे? परंतु त्याचा तेव्हा मी तसा अर्थ लावला, कारण मी ते होईल तितक्या उत्कृष्ट रितीने येथे मंचावर उभे राहून बोललो आहे.

346 परंतु, ओह, मी बहुतेक काही सांगितले आहे! ठीक आहे. ओह! तुम्ही पाहाल. फक्त पहात राहा. पाहा.

347 आता, ओह, आपण ह्या समयात राहत आहोत ह्यासाठी आनंदीत नाही का! [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] जेव्हा आपण ह्या सर्व गोष्टी होताना पाहू. मला वाटते.

राष्ट्रे तुटत आहेत, इस्त्राएल जागा होत आहे,
जी चिन्हे संदेष्ट्याने सांगून ठेवली आहेत;
परराष्ट्रीयांचे दिवस मोजले गेले. ते भयाने ग्रस्त आहेत;
“अहो, विखुरले गेलेल्यांनो, तुमच्या स्वकीयांकडे परत या.”

मुक्तीचा दिवस जवळ आहे,
लोकांची अंत:करणे भीतीने घाबरे झाली आहेत.
आत्म्याने परीपूर्ण व्हा, तुमचे दिवे नीट व स्वच्छ करा.
वर पाहा, तुमची मुक्ती जवळ आहे. (ओह बापरे!)

खोटे संदेष्टे खोटे बोलत आहेत, परमेश्वराचे सत्य ते नाकारत आहे,
तो येशू जो ख्रिस्त आहे आपला परमेश्वर आहे;

तुम्ही ह्यावर विश्वास ठेवता काय? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.]

परंतु आपण तेथे चालू जेथे प्रेषित चालले होते.

कारण मुक्तीचा दिवस जवळ आहे.
लोकांची अंतःकरणे भीतीने घाबरी झाली आहेत.
आत्म्याने परिपूर्ण व्हा, तुमचे दिवे नीट व स्वच्छ करा.
वर पाहा, तुमची मुक्ती जवळ आहे!

348 हे अद्भूत आहे की नाही? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा] मला ते आवडते. मुक्ती जवळ आहे.

आणि संध्याकाळच्या समयी प्रकाश असेल,
गौरवाचा मार्ग तुम्हाला निश्चित सापडेल;
जल मार्गातही, आज प्रकाश आहे;
येशूच्या मौल्यवान नावात गढून जा.
तरुण आणि वृध्द, तुमच्या सर्व पापांचा पश्चाताप करा,
पवित्र आत्मा निश्तिच आत येईल;
संधीप्रकाश आला आहे,
हे सत्य आहे की परमेश्वर आणि ख्रिस्त एक आहोत.

तो वचन आहे! ओह, किती अद्भूत आहे!

लवकरच कोकरा त्याच्या वधूस त्याच्या बाजूस घेईल,
स्वर्गातील सर्व सेना एकत्र होईल;
ओह, ते गौरवी दृश्य असेल, सर्व संत पांढरे डाग विरहीत वस्त्र घातलेले असतील;
आणि येशू समवेत ते सर्वकाळासाठी आनंद करतील.

ओह, "या आणि भोजन करा," स्वामी बोलावतो, "या आणि भोजन करा,"
ओह, तुम्ही येशूच्या मेजावर सर्वसमयी आनंद कराल;
त्याने समुहाला खाणे दिले, पाण्यास द्राक्षारस केले,
जे भुकेलेले आहेत त्यांना बोलावतो, "या आणि भोजन घ्या."

ओह, "या आणि भोजन करा." स्वामी बोलावतो, "या आणि भोजन करा," (वचनाबरोबर भोजन करा!)
तुम्ही येशूच्या मेजावर सर्वसमयी आनंद करु शकता;
त्याने समूहाला खायला दिले, पाण्याचा द्राक्षारस केला,
जे भुकेलेले आहेत त्यांना बोलावतो, "या आणि भोजन करा."

349 ओह, काय तुम्ही भुकेलेले आहात? [मंडळी आनंद करते—सम्पा.] "जे नीतिमत्वासाठी भुकेले आणि तान्हेले ते धन्य."

350 तुम्ही त्याच्यावर प्रेम करता का? [मंडळी म्हणते. "आमेन"—सम्पा.] तुम्ही त्याच्यावर प्रेम करता का? *तुम्हाला प्रेम करण्याची* चावी माहीत आहे काय? आपण सर्व आता उभे राहूया. आणि आपले हात वर उभारू आणि आपल्याला त्यास प्रकट करु. "मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो. कारण त्याने मजवर प्रथम प्रेम केले." ठीक आहे. आता सर्व एकत्र मिळून.

मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो
कारण त्याने मजवर प्रथम प्रेम केले
आणि माझे तारण विकत घेतले
त्या कलवरीच्या झाडावर.

351 [एक भाऊ अन्य भाषेत बोलतो. भाऊ ब्रॅन्हम थांबतात—सम्पा.] फक्त आदरभावयुक्त असा. आपल्याकडे येथे एक अनुवादक आहे भाऊ हीगीन बॉथम आहेत. मला ठाऊक नाही की तो येथे आजरात्री आहे किंवा नाही. आपल्याला पाहायचे आहे की तो आपल्याशी काय बोलला. एक मिनिट थांबा. येथे येथे…[एक बहिण अनुवाद करते.]

352 निश्चितच, प्रभूची स्तुती होवो! माझा विश्वास परमेश्वरावर उंचावला गेला आहे. तुम्ही, तुम्ही त्याच्यावर ह्या रात्री तुमच्या पूर्ण हृदयाने प्रेम करता काय? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] ओह, त्याची स्तुती करा, आणि म्हणा. "धन्यवाद, प्रभू येशू!" [मंडळी परमेश्वराची स्तुती करते.]

353 प्रभू आम्ही तुझी स्तुती कशी करतो, आमच्या संपूर्ण हृदयाने करतो! परमेश्वराचे गौरव असो!

354 तुम्ही सर्व लोक त्याची स्तुती करा. परमेश्वर तुमच्याबरोबर असो! [मंडळी परमेश्वराची स्तुती करणे आणि आनंद करणे चालू ठेवते—सम्पा.]

*तिसरा शिक्का* MAR63-0320

(The Third Seal)

*सात शिक्क्यांचे प्रगटीकरण सत्र*

हा संदेश मूळ रूपाने इंग्रजीत भाऊ विलियम मेरियन ब्रंहम यांनी बुधवारी संध्याकाळी, 20 मार्च, 1963 रोजी, अमेरिकेच्या इंडियानाच्या जेफरसनविले येथील ब्रन्हम टेबरनेकल, जेफरसनविले, इंडियाना, यु.एस.ए मधून प्रचार केला होता.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## <u>छपाईच्या हक्काची सूचना</u>

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org